cmyk

## संपादकीय

### केंद्र सरकारचा हेकेखोरपणा विरोधी राज्यांच्या मुळावर

केंद्रीय यंत्रणांचा अनिर्बंध वापर करून विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यात केंद्रीय यंत्रणा पाठवून विरोधकांना त्रास दिला जात असल्याच्या असंख्य तक्रारी आहेत. याबाबत अनेक राज्यांची केंद्र सरकार बरोबर संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यातून हा दुरावा वाढत चालला असून 'को-ऑपरेटिव्ह फेडरलिझम'च्या तत्त्वाला तिलांजली दिली जात आहे. तुमचे राजकारण कितीही विरोधी तत्त्वांचे असो; पण केंद्र आणि राज्य सरकारांनी एकमेकांशी समन्वयानेच काम करावे अशी अपेक्षा असते, पण केंद्रातील मोदी सरकारच्या एककल्ली राजवटीमुळे हे तत्त्व मागे सारले गेले आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### झारखंड मंत्रिमंडळात ११ मंत्र्यांचा होणार समावेश; उद्या राजभवनात शपथविधी

रांचीः २०२४ झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ११ मंत्र्यांचा समावेश केला जाणार आहे. त्यांचा शपथविधी गुरूवारी होईल. झारखंडमध्ये झामुमोच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने नुकतेच पुन्हा सरकार स्थापन केले. त्या आघाडीतील इतर घटक पक्षांत काँग्रेस, राजद आणि भाकप(एमएल) या पक्षांचा समावेश आहे. झामुमोला सर्वाधिक ५, तर काँग्रेसला त्याखालोखाल ४ मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. राजद आणि भाकप(एमएल) च्या वाट्याला प्रत्येकी १ मंत्रिपद येणार असल्याचे समजते. मंत्र्यांचा शपथविधी रांचीतील राजभवनात होईल. राज्यपाल संतोषकुमार गंगवार मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२२२ बुधवार, दि.०४ डिसेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये

# कृषीमंत्र्यांना पीकविम्याची माहिती सांगता येईना!

## लोकसभेत विरोधकांचा संताप ; उत्तरात मंत्र्यांकडून मोदींचे गुणगान

नवी दिल्ली । वृतसंस्था

शेतकरी संघटनांनी दिल्ली चलोचा नारा देत शेतकरी आंदोलनाची तयारी सुरू केली. तर संसदेत मंगळवारी (दि.३) सोयाबीन, कापूस हमीभाव खरेदी, पिकविमा, शेतकऱ्यांच्या दुप्पट उत्पन्नावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरलं. सोयाबीन, कापसाचे दर हमीभावापेक्षा कमी आहेत. तरीही सरकारची खरेदी अत्यल्प आहे, सरकारी खरेदीची स्थिती नेमकी काय आहे, २०२३–२४ मध्ये किती शेतकऱ्यांना पिकविमा मिळाला, त्याची आकडेवारी काय? याबद्दल काँग्रेसचे खासदार डॉ. नामदेव किरसान पान २ वर



### मंत्री भरकटले अन् विरोधकांनी वॉक आऊट केले

स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीवरून काँग्रेस सरकारवर त्यांनी टिकाही केली. पण या सगळ्यात सोयाबीन, कापूस दर, हमीभाव खरेदी, पीकविम्याचा प्रश्न आणि शेतकऱ्यांचें दुप्पट उत्पन्न यावर शब्दही न उच्चारता चर्चा मोदींच्या गुणगानाकडे वळवली. त्यावरून विरोधकांनी घोषणाबाजी केली. आणि शेवटी सभागृहातून वॉक आऊट केले. त्यातच प्रश्नोत्तराचा तास संपला.

### खा.आझाद कीर्ती झा यांची कठोर टिका

पश्चिम बंगालचे वर्धमान दुर्गापुरचे खासदार आझाद कीर्ती झा यांनी सरकरच्या मंत्र्यांच्या वर्तनावर कठोर शब्दांत टिका केली. १७ पैकी ९ खासदार शेती प्रश्नावर बोलत आहेत. पण त्यावर सभागृहात चर्चा का होऊ दिली जात नाही, असे म्हणत झा यांनी खताच्या काळ्या बाजाराबद्दल प्रश्न उपस्थित केला. सरकार गंधारीसारखी डोळ्यांवर पट्टी बांधून बसले आहे आणि खासगी उद्योगवाले दुर्योधन झाले आहेत, असेही झा म्हणाले. तर लोकसभेत दिवसभर शेतीच्या प्रश्नावर विरोधकांनी अधूनमधून प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. पण त्यावर सखोल चर्चा सत्ताधाऱ्यांनी केलीच नाही.

## अपात्र लाडक्या बहिणींना मिळणार डच्चू!

### २१०० रुपये एप्रिलपासून मिळण्याची शक्यता



पुणे । प्रतिनिधी

निवडणुका संपल्यानंतर लाडक्या बहिणी २१०० रुपये कधीपासून मिळणार याची वाट पाहत आहेत. सरकार मात्र कागदपत्रांची पडताळणी करून, निकष तपासून अपात्र लाडक्या बहिणींना डच्चू देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. तसेच लाडक्या बहिणींना एप्रिलपासून २१०० रुपये देण्याचा निर्णय होऊ शकतो, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

सरकारने निवडणुका डोळ्यापुढे ठेऊन मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. योजनेत सहभागी होण्यासाठी अटी आणि निकषही लावले. मात्र निवडणुका असल्याने अर्जांची पडताळणी न करता, कागदपत्रे न तपासता महिलांना पैसे दिले. कारण सरकारला लाडक्या बहिणींना नाराज करायचे नव्हते. जवळपास अडीच कोटी अर्ज आले होते. त्यापैकी २ कोटींहून अधिक महिलांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आले. सरसकट महिलांना पैसे देण्यात आले, असेही म्हणायला हरकत नाही. पण आता सरकार लाडक्या बहिणींनी भरलेल्या अर्जांची पडताळणी करणार आहे, असे स्पष्ट संकेत मिळत आहेत. कारण जर सरसकट लाभ द्यायचा होता तर नियम आणि अटी का लावल्या? असा प्रश्न आहे. लाडकी बहीण योजनेत अनेक अपात्र महिलांनाही लाभ मिळत असल्याची चर्चा प्रशासनामध्ये आधीपासूनच आहे. सरकारने अर्ज भरून घेताना हमीपत्रही भरून घेतले आहे. त्यानुसार सरकार कागदपत्रांची पडताळी करू शकते. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचा निर्णय अर्थसंकल्पात पान २ वर

# महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आज ठरणार!

## भाजप निवडणार गटनेता; मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संभाव्य यादी







मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या नवीन सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरला होणार आहे. यावेळी २२ ते ३४ मंत्र्यांचा शपथविधी होण्याची शक्यता आहे. शपथविधीच्या कार्यक्रमात भाजपचे जवळपास १९, राष्ट्रवादी काँग्रेसचे ७ आणि शिवसेनेचे ५ नेते मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेते मंत्रिमंडळात असतील. तत्पुर्वी दि. ४ डिसेंबर रोजी पक्षाच्या दोन निरीक्षकांच्या उपस्थितीत भाजप आपल्या पक्षाचा गटनेता निवडणार असून महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण असणार हे त्याच वेळी ठरणार आहे.**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले तरी अजूनही राज्यात नवे सरकार स्थापन झाले नाही. घोडं नेमकं अडलं कुठं ? हे मात्र जनतेला समजले नाही. मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्यामुळे विलंब होत आहे, फडणवीस यांच्या ऐवजी दुसऱ्याची पान २ वर

### फडणवीस–शिंदे यांच्यात बंद दाराआड चर्चा

भाजपची गटनेता निवडण्यासाठी बुधवारी बैठक होणार असून मंगळवारी उशिरा वर्षा बंगल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. दोघांमध्ये बंद दाराआड बऱ्याच वेळ चर्चा झाली आहे.

### भाजपचे 'हे' नेते घेणार मंत्रिपदाची शपथ?

देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, आशिष शेलार, रवींद्र चव्हाण, अतुल सावे, सुधीर मुनगंटीवार, नितेश राणे, गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, राहुल नार्वेकर, अतुल भातखळकर, शिवेंद्रराजे भोसले, गोपीचंद पडळकर, माधुरी मिसाळ, राधाकृष्ण विखे पाटील, जयकुमार रावल

### राष्ट्रवादी काँग्रेसचे हे असणार मंत्री?

अजित पवार, धनंजय मुंडे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, अदिती तटकरे, धर्मरावबाबा आत्राम

### शिंदेसेनेच्या यांचा होणार शपथविधी?

एकनाथ शिंदे, दीपक केसरकर, उदय सामंत, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील

### अजित दादांना हवीत ११ मंत्रिपदे, केंद्रात कॅबिनेट, राज्यपालपद

शपथविधीला दोन दिवसांपेक्षाही कमी अवधी बाकी असताना राष्ट्रवादी काँग्रेसकडून भाजप नेते आणि गृहमंत्री अमित शाहांकडे ११ मंत्रिपदाची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादीला राज्य सरकारमध्ये ७ कॅबिनेट आणि २ राज्यमंत्री पदे हवी असल्याची सूत्रांची माहिती आहे. याशिवाय प्रफुल पटेलांसाठी केंद्र सरकारमध्ये एक कॅबिनेट पद, तसेच पक्षातील वरिष्ठ नेत्यासाठी राज्यपाल पदाचीही मागणी असल्याची माहिती आहे.

### वर्षा निवासस्थानी घडामोडींना वेग

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उदय सामंत आणि भाजप नेते गिरीश महाजन यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली आहे. तिघांमध्ये वर्षा बंगल्यातील मुख्यमंत्र्यांच्या अ‍ॅटी चेंबरमध्ये अर्धा तास चर्चा झाली आहे. संभाव्य खाते वाटपावर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सोमवारी सुध्दा गिरीश महाजन हे मुख्यमंत्र्यांच्या भेटीला ठाण्याच्या शुभदिप बंगल्यावर दाखल झाले होते. त्यानंतर मंगळवारी महाजन पुन्हा वर्षा बंगल्यावर गेले. शिंदे यांच्याशी त्यांनी बंद दाराआड चर्चा केली आहे. शिंदे आणि त्यांच्या साथीदारांच्या चर्चेत संभाव्य खाते वाटपाबाबत चर्चा झाल्याचे समजते.

### सोन्या चांदीच्या दरात किती झाली वाढ?

मुंबई : दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, सोन्याच्या दरात १५२ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळं सध्या २४ कॅरेट सोन्याचा दर हा सरासरी ७६४६० रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. तर दुसऱ्या बाजुला चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. चांदीच्या दरात प्रति किलो १३८९ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळं आज चांदीचे दर ९०००० रुपयांवर गेले आहेत. दिल्लीत सोन्या चांदीचा दर काय दरम्यान, दिल्लीच्या सराफा बाजारात देखी ससोन्याचे दर वाढले आहेत.



**मुंबई : येत्या ५ तारखेला मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या महायुतीच्या शपथविधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा आज महायुतीच्या शिष्टमंडळाने घेतला. यावेळी सुरक्षा व्यवस्था, बैठक, वाहन पार्किंग आदी बाबत योग्य सूचना संबंधित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या. या शिष्टमंडळात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आ.धनंजय मुंडे, आ.हसन मुश्रीफ, आ.प्रवीण दरेकर, आ.गुलाबराव पाटील, आ.अनिल भाईदास पाटील, आ.संजय सिरसाट यांसह महायुतीतील घटक पक्षांचे मान्यवर नेते तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी दिसत आहेत.**

## ब्लिडिंग आय विषाणूचा १७ देशांत फैलाव, १५ जणांचा बळी

नवी दिल्ली । वृतसंस्था

आफ्रिकेतील रवांडा या देशात ब्लिडिंग आय नावाच्या एका विषाणूची साथ पसरली असून या आजारामुळे आतापर्यंत १५ लोकांनी जीव गमावला आहे. गंभीर बाब म्हणजे आफ्रिकेतील १७ देशांत हा आजार पसरला आहे. यातील सर्वाधिक चिंतेची बाब अशी की या आजारामध्ये मृत्यू ओढवण्याची शक्यता ५० टक्के इतकी जास्त आहे, त्यामुळे पृथ्वीवरील माणसांना प्रादुर्भाव होत असलेल्या विषाणूंतील हा सर्वांत घातक विषाणू मानला



जात आहे. कोरोना महामारीतून सावरलेल्या जगासमोर नव्याने आव्हान पान २ वर

### प्रार्थनास्थळ कायदा १९९१च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

नवी दिल्ली । वृतसंस्था

धार्मिक स्थळांच्या संदर्भात अलीकडे भरपूर वाद सुरू असताना १९९१ चा प्रार्थनास्थळ कायदा खूप चर्चेत आला आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या आहेत. आता प्रार्थनास्थळ कायदा १९९१ च्या वैधतेलाच आव्हान देणाऱ्या याचिकांवर बुधवारी ४ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. या प्रकरणी आतापर्यंत एकूण ६ याचिका दाखल करण्यात पान २ वर

### • मारकडवाडीतील बॅलेट पेपरवरील मतदान स्थगित

## दुप्पट फौजफाटा बोलावत प्रशासनाचा ग्रामस्थांवर दबाव

### ग्रामस्थ आता निवडणूक आयोगाच्या विरोधात मोर्चा आंदोलन करणार

सोलापूर । प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी येथे विधानसभा निवडणूकीत मतदाना दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारापेक्षा भाजपाच्या उमेदवाराला पडलेली मते अधिक होती. त्यामुळे ईव्हीएममधून इतक्या मोठ्या प्रमाणावर ही मते पडलीच कशी असा सवाल करत मारकडवाडी गावातील ग्रामस्थांनी ठराव करत स्वतःच्या पैशातून मतपत्रिकेवर पुन्हा निवडणूक घेणार असल्याचे जाहिर केले. मात्र स्थानिक प्रशासनाने ग्रामस्थांवर दुपटीने पोलिसांचा दबाव पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०३ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.५० क्विंटल | २,७०० | २,७०० | २,७०० |
| ज्वारी/हायब्रिड: ६३.५० क्विंटल | १,८०० | २,७७० | २,२८३ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : २५.०० क्विंटल | ६,००१ | ७,४४० | ६,७१२ |
| बाजरी: २२.५० क्विंटल | ३,००० | ५,३८० | ३,८२० |
| मुग : १.५० क्विंटल | ६,९५१ | ७,१३० | ७,०४० |
| सोयाबीन: २०३.०० क्विंटल | २,२३१ | ४,२५० | ३,९४४ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |

# पार्किंगची सुविधा असताना जिल्हा रुग्णालयासमोरच वाहनांच्या रांगा

## जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्याकडून शिस्त लावण्याचा प्रयत्न

बीड । प्रतिनिधी

**दिवाळी पुर्वी जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून डॉ. अशोक थोरात यांची बदली झाल्यावर त्यांनी जिल्हा रुग्णालय प्रशासनात सुधारणा केल्या आहेत. तसेच जिल्हा रुग्णालयात सर्वत्र रुग्ण व त्यांचे नातेवाईक वाहने लावत होती. मात्र त्यांच्यासाठी स्वतंत्र अशी पार्किंगची व्यवस्था करुनही** जिल्हा रुग्णालयासमोरच वाहनांच्या रांगा असून ये-जा **करणाऱ्या वाहनांसह रुग्णांना घेऊन येणाऱ्या वाहनधारकांना याचा नाहक** त्रास होत आहे. पान २ वर







### जिल्हा रुग्णालयासमोरील रस्त्याचा श्वास मोकळा करा

स्वतंत्र पार्किंग असताना सुध्दा जिल्हा रुग्णालयासमोरील रस्त्यावर दोन्ही बाजूंनी वाहने उभी केली जात असून त्यामुळे या रस्त्याने जाणाऱ्यास आणि रुग्णांना घेऊन येणाऱ्या वाहनधारकांना याचा त्रास होत आहे. त्यामुळे जिल्हा रुग्णालयासमोरील रस्ता मोकळा करुन त्या ठिकाणी वाहने उभी करणाऱ्यांना दंड आकारला जावा, अशी मागणी होत आहे.

cmyk

## अग्रलेख

# केंद्र सरकारचा हेकेखोरपणा विरोधी राज्यांच्या मुळावर

केंद्रीय यंत्रणांचा अनिर्बंध वापर करून विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यात केंद्रीय यंत्रणा पाठवून विरोधकांना त्रास दिला जात असल्याच्या असंख्य तक्रारी आहेत. याबाबत अनेक राज्यांची केंद्र सरकार बरोबर संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यातून हा दुरावा वाढत चालला असून 'को-ऑपरेटिव्ह फेडरलिझम'च्या तत्त्वाला तिलांजली दिली जात आहे. तुमचे राजकारण कितीही विरोधी तत्त्वांचे असो; पण केंद्र आणि राज्य सरकारांनी एकमेकांशी समन्वयानेच काम करावे अशी अपेक्षा असते, पण केंद्रातील मोदी सरकारच्या एककल्ली राजवटीमुळे हे तत्त्व मागे सारले गेले आहे. सततच असा अनुभव येत असल्याने राज्य सरकारेही आता आक्रमक भूमिकेत आलेली दिसत आहेत. त्यातून जनताच भरडली जात आहे असे सर्रास चित्र आहे.

अगदी अलीकडच्या एका प्रकरणात तामिळनाडू तेथील द्रमुक सरकारने ईडीच्या एका अधिकाऱ्याला २० लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले, त्याचा लाचलुचपत कायद्याअंतर्गत तपास पूर्ण करून त्या अधिकाऱ्याच्या विरोधात आरोपपत्र तयार करण्यात आले आहे. परंतु हे आरोपपत्र दाखल करायला केंद्र सरकारने आडकाठी आणली. केंद्र सरकार याप्रकरणी तामिळनाडू सरकारच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात गेली होती. पण सुदैवाची बाब अशी की सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या अधिकाराचे रक्षण करीत केंद्रीय अधिकाऱ्यांना अटक करण्याचा राज्यांना अधिकार असल्याचा निर्वाळा दिला आहे. त्यामुळे आता विरोधकांची राज्य असलेल्या ठिकाणी केंद्रीय यंत्रणांची किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांची एकतर्फी मनमानी चालणार नाही, असे चित्र स्पष्ट झाले आहे. पण खरे पाहता राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात असे टोकाचे वितुष्ट येणे अंतिमतः लोकशाही यंत्रणेलाच मारक ठरणारे आहे. केंद्राने विरोधकांची सरकारे असलेल्या राज्यांच्या बाबतीत दुजाभाव केला आहे. कर्नाटक, झारखंड, तामिळनाडू आणि दिल्ली या विरोधकांची सरकारे असलेल्या राज्यांचा अक्षरशः लक्षावधी कोटी रुपयांचा निधी केंद्राने थकवला आहे. राजकीय आकसापोटीच हा उद्योग सुरू आहे, पण त्याचा फटका त्या त्या राज्यातील जनतेच्या कल्याणकारी योजनांना बसतो आणि त्यात जनताच भरडली जाते हा सारासार विचार सध्याच्या केंद्र सरकारकडून होताना दिसत नाही. मध्यंतरी केंद्र सरकारने आमचे किती लाख कोटी रुपये अडवून ठेवले आहेत याची माहिती देणारी जाहिरात कर्नाटक सरकारने सर्व देशातील प्रमुख राजकीय वृत्तपत्रांमध्ये दिली होती. झारखंडसारख्या गरीब राज्याचे सुमारे १ लाख ३६ हजार कोटी रुपये केंद्राने अडवून ठेवले आहेत, असा आरोप होतो आहे. त्यावर समर्पक उत्तरे मिळत नाहीत. ही सगळी परिस्थिती कुठल्या दिशेने चालली आहे आणि त्याचे अंतिम परिणाम काय होणार आहेत याचा सहज अंदाज बांधता येतो. पण विद्यमान केंद्र सरकारला त्याची जराही फिकीर करावीशी वाटत नाही. ईडी, सीबीआय, एनआयए या केंद्रीय यंत्रणांचा देशभरातील उच्छाद विरोधकांसाठी खूप त्रासदायक ठरत आहे. त्या विरोधातही विरोधी पक्षांची राज्ये आता आक्रमक भूमिका स्वीकारत आहेत. पश्चिम बंगालमध्ये ईडीच्या सततच्या कारवायांच्या विरोधात तेथील राज्य सरकार आक्रमक झाले आहे. ईडीच्या कारवायांना पायबंद घालण्याच्या उपाययोजना त्यांनी सुरू केल्या आहेत. अनेक राज्यांनी सीबीआयला आपल्या राज्यात प्रवेश नाकारला आहे. ही सगळी परिस्थिती पाहिल्यानंतर भारतीय संघराज्य व्यवस्था किती सुस्थितीत आहे याची आपण कल्पना करू शकतो. तमिळनाडूसारख्या घटनेकडे पाहता असे लक्षात येते की, ईडीच्या अधिकाऱ्याला २० लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडल्यानंतरही त्याच्यावर कारवाई करण्याचा अधिकार त्या राज्य सरकारला नसेल तर मग कशालाच अर्थ उरत नाही.

एकमेकांच्या अधिकार क्षेत्रात हस्तक्षेप करण्याने केंद्र आणि राज्य सरकारांचे संबंध दिवसेंदिवस असेच बिघडत जातील. केंद्र आणि राज्य सरकारांचे परस्परसंबंध आणि एकमेकांचे अधिकार यावर शिफारशी करण्यासाठी राजेंद्रसिंह सरकारीया या सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला गेला होता. सरकारीया आयोग म्हणून हा आयोग प्रसिद्ध आहे. या आयोगाने ज्या शिफारशी केल्या होत्या त्या बरहुकूम नंतर देशाचा कारभार चालला, पण आता सरकारीया आयोगाच्या या शिफारशी पद्धतशीर बासनात गुंडाळल्या गेल्या आहेत. सरकारीया आयोगाने एकूण २४७ शिफारशी केल्या आहेत. त्या सगळ्या शिफारशी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्याचे तंतोतंत पालन झाले, तर भारतीय संघराज्य सुनियोजित पद्धतीने चालू राहू शकेल, पण तसे होताना दिसत नाही. केंद्र सरकारने राज्यपालांमार्फत आपले हस्तकच विविध राज्यांमध्ये नियुक्त केले आहेत आणि हे हस्तक विरोधकांची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये जो उपद्रव माजवत आहेत त्याच्या कहाण्या वर्तमानपत्रात नियमित छापून येतात. त्याविषयीचे अनेक खटलेही सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेले आहेत. ही सगळी विदारक स्थिती पाहता केंद्र सरकारने देशाच्या अखंडतेसाठी आणि सुनियोजित लोकशाही प्रक्रियेसाठी सरकारीया आयोगाच्या शिफारशींकडे पुन्हा एकदा कटाक्षाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त प्रहारच्या वतीने दिव्यांगाना ब्लँकेट वाटप

## दिव्यांच्या ५% निधीसाठी नगरपरिषद समोर केले आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**दि ०३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त माजलगाव प्रहार संघटनेच्या वतीने १०० दिव्यांग बांधवांना ब्लँकेट वाटप करून साजरा करण्यात आला.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक प्रताप राजंवण हे होते तर नितीन मुंदडा यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होते, तसेच माजलगाव नगर परिषदेमध्ये जवळपास २०० दिव्यांगांची नोंद असून दिव्यांग बांधवांचा हक्काचा ५% निधी २०२३ ते २०२४ मार्च अखेर वर्षाचा नगरपरिषदे कडे निधी जमा असून नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना निधी वाटप करण्यासाठी वेळोवेळी निवेदन देऊनही निधी वाटप केला नाही हा निधी नगरपरिषदेच्या स्वय उत्पन्नातून जमा असून हा निधी वाटप करण्यासाठी का अडचण येते काही दिव्यांगांनी आमचा हक्काचा निधी असुन वाटप का करत नाहीत असं बोलून दाखवले निधी वाटप केला नसल्याने नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या विरोधात प्रहार संघटनेच्या व दिव्यांग बांधवांच्या वतीने घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले.या आंदोलनासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका अध्यक्ष गोपाळ पैंजणे,भारत डोंगरे, नितीन कांबळे, विजय जोगडे, गणेश शिंदे,यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.यावेळी प्रहार चे पदाधिकारी, कार्यकर्ते,दिव्यांग बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# मत्स्योदरी देवी संस्थान विकास कामात अडथळा करणाऱ्या विरुद्ध कारवाई करणार

**अंबड । प्रतिनिधी**

**मराठवाड्यामध्ये प्रसिद्ध असलेली अंबड शहरातील श्री आई अंबिका मत्स्योदरी देवी संस्थान परिसरामध्ये शासकीय नियमाप्रमाणे काम सुरू असून त्या कामांमध्ये कोणी अडथळा निर्माण करणार असेल तर त्याच्या विरुद्ध कोठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा संस्थांचे अध्यक्ष तहसीलदार विजय चव्हाण व सचिव यांनी दिला आहे.**

दि.२०/११/२०२४ वार बुधवार रोजी पूर्ण डोंगराच्या पथ मार्गाचे काम सदरील गुत्तेदाराद्वारे सुरू करण्यात आले आहे. डोंगराच्या पाठीमागील नगरपालिका अग्निशामक दल पर्यंत पथमार्गाचे खोदकाम झाले आहे. पण डोंगराच्या पाठीमागच्या बाजूला काही अतिक्रमण धारकांनी काम अडविले आहे. त्या अतिक्रमण धारकाचे म्हणणे आहे , ''तुमचा पथ मार्ग झाल्यास आमच्या घरात पाणी जाईल'' आणि काही अतिक्रमण धारकांचे घर असल्यामुळे पथमार्गाचे काम बंद केले आहे. याची माहिती संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण आणि सचिव नायब तहसीलदार श्री महेंद्र गिरगे यांना कळविण्यात आले. त्यांनी दिनांक ३/१२/२०२४ रोजी संपूर्ण डोंगराला प्रदक्षिणा घातली व त्यांच्या निदर्शनास आले. यावेळी संस्थांन अध्यक्ष तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी जे अतिक्रमण करणारे या पथ मार्गाचे कामात अडथळा आणण्याचा त्याच्यावर कारवाई करून पोलीस बंदोबस्त मध्ये अतिक्रमण काढण्यात येईल व सरकारी कामास अडथळा आणल्यास त्यावर कायदेशीर कारवाही करण्यात येईल व त्याच्याकडे अतिक्रमण धारका असल्याचा काय रेकॉर्ड आहे, त्यांनी तहसील कार्यालयात दाखल करावे. यावेळी संस्थान सचिव तथा नायब तहसीलदार श्री महेंद्र गिरगे, संस्थान विश्वस्त पुजारी श्री गीताविलास कुंठेफळकर, संस्थान व्यवस्थापक श्री कैलास शिंदे व संस्थान कर्मचारी उपस्थित होते.



# ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलन पार्श्वभूमीवर ४ डिसेंबर रोजी साहित्यिकांची बैठक

## साहित्यिकांना सहभागी होण्याचे स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईच्या वतीने येत्या १४ व १५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेले अंबाजोगाई साहित्य संमेलनात शहर व परिसरातील अधिकाधिक साहित्यिकांनी सहभागी व्हावे याचे आवाहन करण्यासाठी शहरातील सर्व साहित्यिक शिक्षक-प्राध्यापकांच्या एका व्यापक बैठकीचे आयोजन ४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता करण्यात आले असून या बैठकीस शहरातील सर्व साहित्यिक, शिक्षक-प्राध्यापकांनी सहभागी व्हावे असे आवाहन स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी केले आहे.**

मराठवाडा साहित्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने प्रति दोन वर्षी अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते. लोकाश्रयावर आधारीत असलेले हे ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलन यावर्षी १४ व १५ डिसेंबर रोजी येथील नगर परिषदेच्या आद्यकवी मुकुंदराज स्वामी सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या संमेलना पुर्वी शहरात साहित्यिक वातावरण निर्माण व्हावे यासाठी स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार, मसाप शाखा अंबाजोगाई चे मार्गदर्शक अमर हबीब, अध्यक्ष दगडू लोमटे, सचीव गोरख शेंद्रे आणि स्वागत समिती व मसापच्या सर्व पदाधिकारी यांच्या पुढाकाराने साहित्य संमेलनापुर्वी शहरात साहित्यिक उपक्रम राबविण्यात यावेत व साहित्य चळवळ अधिक गतीमान व्हावी यासाठी शहरात कथा लेखन कार्यशाळा, गझल लेखन कार्यशाळा, शिक्षक कवी संमेलन, व्यक्ती चित्रण लेखन स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा व इतर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यासर्व उपक्रमास शहरातील साहित्य प्रेमींनी भरभरुन प्रतिसाद दिला होता. यासर्व उपक्रमाच्या यशस्वी आयोजनानंतर आता १४ व १५ डिसेंबर रोजी दोन दिवसीय अंबाजोगाई साहित्य संमेलनात शहर व परिसरातील सर्व साहित्यिक, शिक्षक-प्राध्यापकांनी सहभागी व्हावे व हे संमेलन ख-या अर्थाने गावचे बहुभाषिक संमेलन व्हावे यासाठी शहरातील सर्व साहित्यिक, शिक्षक-प्राध्यापक यांच्या व्यापक बैठकीचे आयोजन ४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता नगर परिषदेच्या पत्रकार कक्ष सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या बैठकीस ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे सर्व स्वागत समितीचे सदस्य उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत वे११ अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या यशस्वीतेसाठी शहरातील मान्यवर साहित्यिकांच्या प्रातिनिधिक स्वरुपातील सुचना समजावून घेवून हा उपक्रम लोकाभिमुख व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलन हे लोकाभिमुख व्हावे यासाठी मसाप शाखा अंबाजोगाई व साहित्य संमेलन स्वागत समितीच्या सर्व सदस्यांच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. या साहित्य संमेलनाच्या यशस्वीतेसाठी आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस शहरातील सर्व साहित्यिक, शिक्षक-प्राध्यापकांनी उपस्थित राहुन सहकार्य करावे असे आवाहन स्वागत समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, सचीव प्रा. पंडीत कराड, उपाध्यक्ष सुभाष बाहेती, मसाप शाखा अंबाजोगाई चे मार्गदर्शक अमर हबीब, अध्यक्ष दगडू लोमटे, सचीव गोरख शेंद्रे व दोन्ही समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

अंबाजोगाई साहित्य संमेलन

## पान १ वरून...

### कृषीमंत्र्यांना पीकविम्याची

यांनी प्रश्नोत्तराच्या तासात कृषीमंत्र्यांना थेट प्रश्न विचारला. मात्र यावर कृषी मंत्र्यांना उत्तरचे देता आले नाही. यामुळे विरोधकांनी चांगलाच संताप व्यक्त केला. कृषी राज्यमंत्री भगीरथ चौधरी उत्तर देण्यासाठी उठले, पण त्यांच्याकडे सोयाबीन, कापूस खरेदी आणि पिकविम्याची आकडेवारी नव्हती. त्यामुळे राज्यमंत्री भगीरथ चौधरी यांची मोठी अडचण झाली. त्यांनी विषयाला फाटा फोडत विरोधकांवर टिका केली. ''मोदी सरकारने २०१४ ते २०२४ च्या दरम्यान २२ पिकांच्या हमीभावात दीडपट वाढ केली. काँग्रेसने शेतकऱ्यांना फसवले, अस चौधरी म्हणाले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी चौधरी यांना प्रश्नाचे नेमके उत्तर द्या, अस सांगितले. पण गणिताच्या पेपरला भूगोलाचा अभ्यास करून जाणाऱ्या विद्यार्थ्यांसारखी भगीरथ चौधरी यांची अवस्था झाली. त्यावर विरोधकांनी घोषणाबाजी करायला सुरुवात केली. तेवढ्यात केंद्रिय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी उभे राहून नेहमीप्रमाणे पंतप्रधान मोदीजी की सरकार म्हणत बोलायला सुरुवात केली. मागील दहा वर्षात धानाचा हमीभाव १३१० रुपये प्रतिक्विंटलवरून २३०० रुपये प्रतिक्विंटल केला. ज्वारीचा हमीभाव १५०० रुपये प्रतिक्विंटल होता. मोदी सरकारने ३ हजार ३७१ रुपये केला. असें शिवराजसिंह सांगत राहिले.

----------

### महाराष्ट्राचा मुख्यमंत्री

वर्णी लागणार, अशा अनेक चर्चा सध्या असून मुख्यमंत्री पदाची जबाबदारी भाजप नेतृत्व कोणावर सोपवते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यासाठी दि. ४ डिसेंबर रोजी पक्षाच्या निरीक्षक केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सितारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुमाणी यांच्या उपस्थितीत गटनेता निवडण्यासाठी बैठक होणार आहे. गटनेता निवडल्यावर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार हे सर्वांना कळेल. शिंदेसेना आणि अजित पवार गटाने अगोदरच पक्षाचे गटनेते निवडले आहेत. महाराष्ट्राच्या नवनिर्वाचित सरकारचा शपथविधी येत्या ५ डिसेंबरला होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या दिवशी २२ ते ३४ मंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. यावेळी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह महायुतीचे अनेक नेते मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपचे जवळपास १९ नेते या दिवशी मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यापासून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, नितेश राणे, गणेश नाईक, राहुल नार्वेकर, अतुल भातखळकर, शिवेंद्रराजे भोसले, गोपीचंद पडळकर, माधुरी मिसाळ अशा नव्या चेहऱ्यांना दिली जाणार असल्याची शक्यता आहे. भाजपला या निवडणुकीत सर्वाधिक यश आलं आहे. भाजपचे तब्बल १३२ आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे मंत्रिमंडळात भाजपच्या मंत्र्यांची संख्या जास्त राहणार आहे. दुसरीकडे ५ डिसेंबरला राष्ट्रवादी काँग्रेसचे ७ नेते मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. तर शिवसेनेचे ५ नेते मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. हे सर्व नेते गेल्या सरकरमधील मंत्रीच असण्याची शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. पण भाजपकडून नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

----------

### अपात्र लाडक्या

घेतला जाऊ शकतो. दुसरीकडे डिसेंबरपासूनच २१०० रुपये दिले जातील, अशी चर्चा आहे. तर सरकारच्या गोटात १ एप्रिलपासून रक्कम २१०० रुपये केली जाईल, अशी चर्चा आहे. म्हणजेच लाडक्या बहिणींना १ एप्रिलपासूनच २१०० रुपये मिळू शकतात, याची दाट शक्यता आहे. नविन सरकार स्थापन झाल्यानंतर याची घोषणा होऊ शकते. निवडणुकीची आचारसंहीता लागण्याआधी अनेक लाडक्या बहिणींना ५ महिन्याचे ७५०० रुपये देण्यात आले. तर काही लाडक्या बहिणींना ४५०० रुपये मिळाले. निवडणुकीत लाडक्या बहिणीचे पैसे १५०० हजारांवरून २१०० रुपये करू असे आश्वासन महायुतीने दिले. लाडक्या बहिण योजनेचा सरकारला मोठा फायदा झाला. लाडक्या बहिणीमुळे आम्ही पुन्हा सत्तेत आलो असे महायुतीचे नेते बोलून दाखवत आहेत. तसेच आम्ही आमचा शब्दही पाळू असे महायुतीच्या नेत्यांनी निवडणुका झाल्यावर लगेच स्पष्ट केले. पण जर सरकारने अर्जांची पडताळणी केली, कागदपत्रे तपासली तर अनेक महिला या योजनेतून बाहेर पडू शकतात.

**सरकार या बाबी तपासण्याच्या तयारीत**

१) महिलेच्या कुटूंबाचे उत्पन्न २.५ लाखांपेक्षा अधिक आहे का. २) अर्ज केलेल्या महिलांचे पती आयकर भरतात का. ३) एकाच कुटूंबातील २ पेक्षा अधिक महिलांनी अर्ज केले का. ४) विधवा, निराधार, परितक्त्या योजनेचा लाभ घेत असतानाही अर्ज केले का. याची पडताळणी केली जाणार आहे. त्यामुळे अनेक महिलांना या योजनेतून बाहेर काढले जाऊ शकते. म्हणजेच या महिलांना लाडक्या बहीण योजनेचा लाभ मिळणार नाही.

-------------

### ब्लिडिंग आय विषाणूचा १७

उभे राहिले आहे. मारबर्ग हा विषाणू आहे, यापासून माणसांना मारबर्ग हॅमरेज फिव्हर हा जीवघेणा आजार होतो. एक प्रकारच्या वटवाघळांत हा विषाणू नैसर्गिकरीत्या सापडतो. सुरुवातीला तीव्र ताप, डोकेदुखी आणि अस्वस्थ वाटणे ही लक्षणे दिसतात. तर पाचव्या दिवसांपासून रुग्णात रक्तस्रावाची लक्षणे दिसू लागतात. उलटी, शौचातून रक्त पडणे, नाक, कान, डोळे, तोंड आणि हिरड्यांतून रक्तस्राव होणे अशी लक्षण दिसू लागतात. सर्वसाधारणपणे आठव्या किंवा नवव्या दिवशी रुग्ण दगावण्याची शक्यता सर्वाधिक असते. ब्लिडिंग आय आजार माणसांकडून फैलवतो. बाधित व्यक्तीच्या शरीरातील स्रावांच्या संपर्कात आल्याने हा आजार होतो. ब्लिडिंग आय या आजारावर कोणतेही व्हॅक्सिन किंवा विषाणूविरोधी उपचार उपलब्ध नाहीत. रुग्णांना दिसत असलेल्या लक्षणांनुसार उपचार केले जातात.

-----------

### दुप्पट फौजफाटा बोलावत

आणत मतदानाची प्रक्रिया स्थगित करण्यास भाग पाडले. मारकडवाडी ग्रामस्थानी आधीच जाहिर केल्याप्रमाणे मंगळवारी मतपत्रिकेवर आधारीत मतदानाची प्रक्रिया पार पाडणार असल्याचे जाहिर केले होते. तसेच यासंदर्भात स्थानिक प्रशासनाला मतदानाच्या अनुषंगाने पत्र देत त्यासाठी होणाऱ्या खर्चाची रक्कमही गावकऱ्यांनी स्वखर्चातून गोळा केली होती. मात्र माळशिरस तालुक्याच्या तहसीलदारांनी मतदानाची प्रक्रिया आणि मतदान फक्त निवडणूक आयोगाकडूनच घेतले जाऊ शकते, असे सांगत गावकऱ्यांना ही प्रक्रिया पार पाडण्यास मनाई केले. तरीही मारकडवाडी ग्रामस्थांनी मतदानाची प्रक्रिया पार पाडणारच असा निर्धार व्यक्त केला. त्यावर पुन्हा स्थानिक प्रशासनाने जर गावकऱ्यांनी तरीही मतदानाची प्रक्रिया पार पाडली तर सर्व गावकऱ्यांच्या विरोधात पोलिसांत गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला. त्यावर पोलिसांकडूनही तशी तयारी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी जाहिर केलेल्या मतदानाचा दिवस उजाडला. त्यानंतर गावकऱ्यांनी मतपत्रिकेवर मतदान करण्याचा निर्णय जाहिर केल्याप्रमाणे जमण्यास सुरुवात केली. मात्र प्रशासनाने गावकऱ्यांच्या लोकसंख्येपेक्षा दुपटीने फौजफाटा गावात बोलावला. यावेळी पोलिस प्रशासनाकडून गावात कलम १४४ लागू करण्यात आले. प्रशासनाच्या मान्यतेशिवाय मतदानाची प्रक्रिया जर पार पाडली. तर सर्व गावकऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातील आणि अटक करण्याचा इशारा दिला गेला. त्यानंतर ग्रामस्थांनी मतदान घेण्याची प्रक्रिया स्थगित केली. मात्र माळशिरसचे नव निर्वाचित आमदार उत्तमराव जानकर यांनी, निवडणूक आयोगाच्या आणि ईव्हीएम मशिन्सच्या विरोधात आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला. त्यावर स्थानिक ग्रामस्थांनी निवडणूक आयोगाच्या विरोधात आणि ईव्हीएम मशिन्सच्या विरोधात आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

**प्रशासनाच दबाव अयोग्य – असिम सरोदे**

दरम्यान, ॲड असीम सरोदे म्हणाले की, मारकडवाडीतील गावकऱ्यांनी ईव्हीएम मशिन्सच्या मतदान प्रक्रियेवर नाराजी दाखवत मतपत्रिकेवर लोकशाही प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. मात्र प्रशासनाने पोलिसांचा मोठ्या प्रमाणावर फौजफाटा मागवून गावकऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत केला. मात्र प्रशासनाने गावकऱ्यांनी स्वंयस्पूर्तीने लोकशाहीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याचा परिणाम विद्यमान विधानसभेच्या निकालावर होणार नसताना अशा पद्धतीने गावकऱ्यांना दबाव आणणे योग्य नसल्याचे मतही यावेळी व्यक्त केले.

**ग्रामस्थांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न म्हणजे लोकशाहीचा खूनच – नाना पटोले**

मारकडवाडीमध्ये प्रशासन अत्याचारी ब्रिटिशांप्रमाणे वागले, यामुळे निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेवर जे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत ते अधिक गडद झाले आहे. 'कर नाही तर डर कशाला?' याप्रमाणे प्रशासनाने हे मतदान पार पडू द्यायला हवे होते, पण भाजपा सरकारच्या काळात सर्व सरकारी यंत्रणाच दबावाखाली काम करत आहे. मारकडवाडीत प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून जनतेचा आवाज दाबण्याचाच प्रकार झाला आहे आणि हाच लोकशाही व संविधानाचा खून असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

----------

### प्रार्थनास्थळ कायदा १९९१च्या

आल्या आहेत. यामध्ये विश्व भद्र पुजारी पुरोहित महासंघ, डॉ. सुब्रमण्यम स्वामी, अश्विनी उपाध्याय आणि जमियत उलेमा-ए-हिंद यांच्या याचिकेचाही समावेश आहे. एका पक्षाने हा कायदा रद्द करण्याची मागणी केली आहे, तर जमियत उलेमा-ए-हिंदने त्याच्या समर्थनार्थ याचिका दाखल केली आहे. नुकतेच संभळच्या शाही जामा मशिद प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयानंतर जमियत उलेमा-ए-हिंदने सर्वोच्च न्यायालयाला पत्र लिहून लवकर सुनावणीची मागणी केली होती. प्रार्थना स्थळ कायदा १९९१ ला हिंदू बाजूने २०२० मध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे, तर जमियत उलेमा-ए-हिंदने २०२२ मध्ये त्याच्या समर्थनार्थ सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

-----------

### पार्किंगची सुविधा असताना जिल्हा

सरकारी रुग्णालय म्हटले की सर्वसामान्य नागरीक त्याकडे दुर्लक्ष करीत खासगी रुग्णालयात रुग्णांना घेऊन जातात. मात्र जिल्हा शल्य चिकित्सक अशोक थोरात यांनी पदभार घेतल्यापासून रुग्णालय प्रशासन, स्वच्छता यासह इतर सुविधा रुग्णांना देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. जिल्हा रुग्णालये परिसरात रुग्ण व त्यांचे नातेवाईक आपली वाहने उभी करीत होते. त्यामुळे रुग्णालयात सर्वत्र वाहनेच वाहने दिसत होती. त्यामुळे अनेक वेळा रुग्णांना घेऊन येणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण झालेला आहे. रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आत वाहने लावण्यास मज्जाव केला. तसेच सर्व वाहनांसाठी मुबलक अशी पार्किंगची व्यवस्था केली गेलेली असताना सुध्दा रुग्णालयात येणाऱ्यांकडून रुग्णालयाच्या समोरील रस्त्यावरच पार्किंग समजून वाहने लावली जात आहेत. त्यामुळे या रस्त्याने जाणाऱ्या आणि जिल्हा रुग्णालयात रुग्णांना घेऊन येणाऱ्या वाहनधारकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ०४ डिसेंबर २०२४



## पत्रकारांच्या भावना दुखावणे हेतू नव्हता, दिलगीर आहे -खा बजरंग सोनवणे

केज । प्रतिनिधी



आ संदीप क्षीरसागर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त करताना अनावधानाने आपले बाबद संशय निर्माण करणारी बातमी कुणाला संशय आला म्हणून केल्याचे आपण म्हटले. यावेळी आपण केज मतदार संघात जीवाचे रान करत प्रचार केला व प्रचार यंत्रणा सांभाळली असे असताना माझ्या भूमिकेवर संशय निर्माण करणारी बातमी देखील माझ्या सारख्या कार्यकर्त्यास मनस्ताप देणारी ठरली. यातून सदरील पत्रकार मित्राकडे तक्रार वजा बोलताना संशय आपणास का घरच्या कुणाला आला असे म्हटले गेले. यावेळी उल्लेख केलेल्या शब्दानी कुणाच्या भावना दुखाव्यात अशी आपली अजिबात इच्छा अपेक्षा नव्हती. मात्र याने माझ्या राजकीय प्रवासात माझ्या सोबत कायम राहिलेल्या माझ्या अनेक सहकारी मित्रांचे मन दुखावले. अश्या सर्व माझ्या मित्राकडे मी दिलगिरी व्यक्त करतो. माझ्या पत्रकार मित्राना दिलगिरी सोबतच हे आवाहन करतो की आपण माझे टिकाकार सल्लागार आहात मी टिकेचे आणी सल्याचे नेहमी स्वागत करत आलोय पुढेही करणारच आहे मात्र आपल्यातील निवडक मित्र ठरवून बदनामी संशय निर्माण करत असतील तर आपण पत्रकार म्हणून अश्या मित्रांना योग्य मार्गदर्शन करावे.मला विश्वास आहे आज ज्या प्रमाणे माझ्याकडे आपण व्यक्त झालात असेच भविष्यात चुकीच्या बातमीला बंध घालाल.बाकी मी माझ्या वक्तव्याने कुणाचे मन दुखावले बाबद दिलगिरी व्यक्त करत आहे.

# दिव्यांग हे देखील समाजाचे मूलभूत घटक असून त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव कटिबद्ध राहू -संकेत मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपल्या समाजातील दिव्यांग बांधव हे देखील सामाजाचे एक महत्वाचे घटक असून त्यांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध राहणार असल्याचे श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनी स्पष्ट केले. आज जागतिक दिव्यांग दिनानिमित्त अंबाजोगाई शहरातील सर्व मूकबधिर, दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांची एकत्रित रॅली काढण्यात आली होती. याप्रसंगी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, बाबासाहेब परांजपे प्रतिष्ठान चे सचिव संभाजी लांडे हे उपस्थित होते.





अंबाजोगाई शहरात जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग रॅलीचे यशस्वी आयोजन

दिव्यांग दिनानिमित्त सर्वप्रथम दिव्यांगांचे आराध्य डॉ हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संकेत मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रगीत घेण्यात आले. राष्ट्रगीतानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करतांना श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनी समाजातील सर्वच दिव्यांग बांधव हे आपल्या समाजाचेच एक महत्वाचे घटक असून त्यांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नेहमी हसू फुलवण्यासाठी त्यांना आनंदी व समाधानी ठेवणे हे महत्वाचे असल्याचे संकेत मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले.

बाबासाहेब परांजपे प्रतिष्ठानचे सचिव संभाजी लांडे यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, दिव्यांग देखील ईश्वराचाच अंश असून त्यांच्याकडे दुर्लक्ष न करता त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण त्यांना साथ दिली पाहिजे जेणेकरून त्यांना आपणात काहीतरी कमी असल्याची भावना निर्माण होणार नसल्याचे सांगितले.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग रॅलीस संकेत मोदी व संभाजी लांडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या रॅलीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसून येत होता. या रॅलीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी काही सामान्य विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. या रॅलीमध्ये दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी देखील मोठया संख्येने सहभागी झाल्याचे दिसून आले. या दिव्यांग रॅलीत जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विनायक मुंजे, बोधवर्धिनी मतिमंद विद्यालयाचे (मुलींचे) मुख्याध्यापक तात्यासाहेब चव्हाण, ज्ञानवर्धिनी मूकबधिर मुलांचे विद्यालय रामराव घुगे, अहिल्यादेवी मूकबधिर मुलींचे विद्यालयाचे मुख्याध्यापक राजाभाऊ मस्के, बाबासाहेब परांजपे अपंग विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती ललिता चव्हाण, कर्तव्य मतिमंद मुलींचे विद्यालयाचे मुख्याध्यापिका श्रीमती अनिता चौधरी, मानव विकास मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंद टाकळकर, मानव विकास मतिमंद विद्यालय आप्पासाहेब चव्हाण, मानव विकास अस्थिव्यंग विद्यालयाचे मुख्याध्यापक इंद्रकुमार लोढा यांच्यासह विशेष शाळेतील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी बँड पथकासह उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद टाकळकर, सूत्रसंचलन गोविंद जगधने तर आभार रामराव घुगे यांनी व्यक्त केले.

## नेकनूर येथील मूकबधिर शाळेत जागतिक दिव्यांग दिन साजरा



नेकनूर । प्रतिनिधी

३ डिसेंबर वार मंगळवार रोजी नेकनुर येथील मूकबधिर निवासी शाळेत जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. समाजात जनजागृती व्हावी व दिव्यांग विद्यार्थ्यांची मते समाजापर्यंत पोहोचली पाहिजे या हेतूने तीन डिसेंबर वार मंगळवार रोजी सकाळी जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. त्यानंतर दिव्यांगाचे आराध्य दैवत डॉक्टर हेलन केलर यांच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आली. दिव्यांग बांधवांना नुसार २०१६ मध्ये त्यांच्यासाठी जे बदल करण्यात आले आहेत ते जनसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. दिव्यांगाना दिल्या जाणाऱ्या सुविधा ह्या त्यांना मिळवून देण्यासाठी आपण समाजातील सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक श्री लुचारे सर यांनी केले. दिव्यांगाना फक्त सहानुभूती न देता त्यांचे अधिकार त्यांना दिले पाहिजेत.३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या रांगोळी स्पर्धा, गोळा फेक, लिंबू चमचा, धावणे इत्यादी. स्पर्धा आनंदाच्या वातावरणात घेण्यात आल्या. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष श्री खारके साहेब यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक केले..या वेळी राखुंडे सर, गिराम सर, खरंगुळे मॅडम,रोकडे सर,आणि शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या सहाय्याने हा जागतिक अपंग दिन संपन्न झाला.

## शिरूर येथे मराठी पत्रकार परिषद आयोजित पत्रकारांचे आरोग्य शिबिर संपन्न

मानूर । प्रतिनिधी

शिरूरकासार मराठी पत्रकार परिषद आयोजित पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्या करीता आरोग्य तपासणी शिबीर शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्रात मंगळवार( ता.३) रोजी संपन्न झाले

मराठी पत्रकार परिषद ही सर्वात जुनी आणि मातृसंस्था म्हणून ओळख असलेल्या या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एस एम देशमुख सर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील पत्रकार बांधवाची आरोग्य तपासणी करून संस्थेचा वर्धापन दिन प्रत्येक वर्षी साजरा करण्याचा उपक्रम सुरू केला या उपक्रमातून मंगळवारी रोजी शिरूर तालुक्यातील परिषदेच्या पत्रकार सदस्यांचा आरोग्य तपासणी प्राथमीक आरोग्य केंद्रात करण्यात आली .



प्राथमीक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी मृणाली घुगे यांच्या मार्गदर्शना खाली आरोग्य शिबिर घेण्यात आले या वेळेस डॉ.मृणाली घुगे, डॉ राठोड ,डॉ.पुजा म्हस्के यांनी पत्रकारांची आरोग्य तपासणी केली त्या मधे रक्तदाब ,शुगर आदिची तपासणी करण्यात आली. यावेळेस जेष्ठ मार्गदर्शक पत्रकार बबनराव देशमुख ,जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस तालुकाध्यक्ष जालिंदर नन्नवरे ,पत्रकार हल्ला कृती समितीचे अध्यक्ष विजयकुमार गाडेकर, अशोकराव भांडेकर ,शंकर भालेकर ,गोरख खेडकर ,नवनाथ सानप, शाहेबाज पठाण, गोकुळ सानप, गोकुळ भुसारे, अशोक कानगावकर, आदी पत्रकारांचा सहभाग होता . या वेळेस मराठी पत्रकार परिषदेच्या वतिने उपक्रम आरोग्य पथकाचा सत्कार करण्यात आला.यावेळेस वैद्यकिय आधिकारी डॉ. मृणाली घुगे यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले.या वेळेस डॉ.डोंगर,डॉ.स्नेहा , बी.एन जाधव,टी.आर.नागरे,वाघुलकर,रामहरी पवार, सुळे हे प्राथमीक आरोग्य केंद्रातील पथकानी शिबिराला सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नवनाथ सानप व आभार शंकर भालेकर यांनी मानले.शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला शहरातील सर्वच पत्रकार उपस्थित होते.

## पाटोदा येथे पत्रकारांचे आरोग्य शिबीर संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

देशातील पत्रकारांची सर्वात मोठी आणि सर्वात जुनी पत्रकार संघटना असलेली मराठी पत्रकार परिषद ८६ व्या वर्धापनदिनानिमित्त मराठी पत्रकार परिषदेचे विश्वत एस.एम.देशमुख,बीड जिल्हा अध्यक्ष विशाल सांळुखे, यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा मराठी पत्रकार परिषदेचे वतीने पत्रकारांचे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथे मोफत आरोग्य तपासणी,इसीजी,रक्त तपासणी,दंत चिकित्सा,डायबीटीस



तपासणी, शिबीरात करण्यात आली. या शिबीराचे उद्घाटन ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक अभिषेक जाधव , मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष अजय जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे डॉ तांदळे, डॉ ओमासे, जेष्ठ पत्रकार इद्रीस चाऊस, दयानंद सोनवणे,एल,आर जाधव,मराठी पत्रकार परिषदे हल्ला कृती समिती अध्यक्ष संजय सानप, सचिन पवार,मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष सोमनाथ खंडागळे , सचिव हमीदखॉन पठाण, उपाध्यक्ष जावेद शेख, अशोक भवर, अनिल गायकवाड, शहराध्यक्ष फय्याज सय्यद, कोषाध्यक्ष दत्ता देशमाने ,नाना डिडुळ, सतिश गर्जे,पदाधिकारी, सदस्य, नागरिक आदी उपस्थित होते.

## शरीरासोबतच बुद्धी व मन सुदृढ असेल तर यश हमखास मिळतेच -सतीश बलुतकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शरीरासोबतच मनुष्याची बुद्धी व मन सुदृढ असेल तर यश हे हमखास मिळतेच अशी भावना क्रीडा शिक्षक सतीश बलुतकर यांनी व्यक्त केली. ते सोमवार दि २ डिसेंबर रोजी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इ. ५वी ते ९वी इयत्तांच्या वार्षिक किडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.या क्रीडा स्पर्धेची सुरुवात हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.



दरवर्षी विद्यार्थी या स्पर्धाची आवर्जुन वाट पहात असतात. या वार्षिक क्रीडा स्पर्धा महोत्सवात इ ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या धावणे, रिलेरेस, थैला रेस, संगीत खुर्ची, दोरीवरील उडया, कब्बडी त्याचबरोबर खो खो या खेळासह विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत. या क्रीडा स्पर्धेचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख गायके एन. के. यांनी केले. आतापर्यंत संस्थेतील विद्यार्थ्यांनी तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्टीय पातळीवरील विविध क्रीडा स्पर्धेत उज्वल यश संपादन करतांना आपल्या संस्थेसोबतच शिक्षक तथा पालकांचे नाव उज्वल केले आहे असल्याचे आपल्या प्रास्ताविकामधुन गायके नानासाहेब यांनी सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी उद्घाटक सतिश बलुतकर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आजच्या मोबाईलच्या काळात सर्वच वयातील विद्यार्थ्यांनी मैदानी खेळासाठी दररोज वेळ देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.विज्ञान तंत्रज्ञान हे आजच्या युगात मानवाचे अविभाज्य घटक बनले असले तरी मैदानी खेळ देखील तेवढाच महत्वाचा असून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नसल्याचे बलुतकर यांनी याप्रसंगी नमूद केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतील संगीत शिक्षक शिनगारे एस.डी.यांनी केले तर किडा स्पर्धेचे प्रमुख कांबळे आर.एस. आणि पंच प्रमुख पाळेकर यु.ए. यांनी आपली भूमिका बजावली. स्पर्धेचे निकालपत्रक लिहण्याची जवाबदारी श्रीमती गजभिये डी.डी. यांनी चांगल्या पध्दतीने पार पाडली. शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी किडा स्पर्धा यशस्वी होण्याकरीता सहकार्य केले.

पान ६ वरून...

### धारूर येथे रक्तदान शिबिर

क्लबच्या वतीने केले जाते. त्यानुसार यावर्षी ही त्यांच्या आठव्या पुण्यतिथी निमित्त किल्ले धारुर शहरातील बस स्थानक येथे पोलिस चौकी येथे रक्तदान शिबीर संपन्न झाले.

या रक्तदान शिबिर कार्यक्रमाचे अध्यक्ष बस डेपो व्यवस्थापक नवनाथ चौरे, प्रमुख अतिथी पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे, माजी नगराध्यक्ष तथा जेष्ठ नागरिक उत्तम भाऊ तोष्णिवाल, डॉ. असोसिएशन चे अध्यक्ष डॉ.मयुर सावंत, पत्रकार अतुल शिनगारे, अविनाश जगताप यांच्यासह मान्यवरांनी मधुकर धस यांच्या प्रतिमेचे पूजन करून रक्तदान शिबिरस सुरुवात केली या शिबिरात एकूण २१ रक्त दात्यानी रक्त दान केले.

रक्तदान शिबिराचा समारोप बस डेपोचे व्यवस्थापक नवनाथ चौरे साहेब यांनी केला सूत्रसंचालन सुरेशराव शिनगारे यांनी केले तर प्रास्ताविक विजय शिनगारे यांनी केले आभार अनिल तिवारी यांनी मानले स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे रक्तपेढी विभागाचे तज्ञ अधिकारी डॉ.मधुकर गावित व त्यांच्या टीम नेरक्तदान शिबिर घेण्यास सहकार्य केले.आजचे रक्तदान शिबीरात किल्ले धारुर युथ क्लब अध्यक्ष अभयसिंह चौहान, सचिव दत्तात्रय गोरे, माजी अध्यक्ष गौतमराव शेंडगे, माजी अध्यक्ष सुर्यकांत जगताप, माजी अध्यक्ष विशालसिंह दिख्खत, जेष्ठ सदस्य अनिल तिवारी सर, रवि गायसमुद्रे, विश्वानंद तोष्णिवाल, महेश गवळी, तेजेस चव्हाण, कपिल समर्थ व इतर सदस्यांनी रक्तदान शिबिर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

रक्तदान शिबिराच्या निमित्ताने आदर्श शिक्षक सुरेश शिनगारे यांनी ४८ व्या वेळचे रक्तदान करत शिबिरात सहभाग घेतला तसेच यशोदिप पब्लिक स्कुलचे संचालक विशालसिंह दिख्खत व त्यांच्या पत्नी प्राचार्य सौ.चित्रा विशालसिंह दिख्खत यांनी सपत्नीक रक्तदान केले. या शिबिरात एकूण एकवीस रक्तदात्याणी रक्त दान केले

### जाहिरात फलक लावल्यास

यांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, जालना शहर महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय तसेच जालना शहर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या जागे व्यतिरीक्त शहरात इतर कोणत्याही ठिकाणी विना परवाना जाहीरात फलक, होर्डींग व पोस्टर्स, बॅनर्स इत्यादी लावण्यात येऊ नये. तसे आढळल्यास संबंधिताविरूध्द दंड आकारून मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ तसेच महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम, १९९५ अन्वये फौजदारी स्वरूपाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. असे आदेश संतोष खांडेकरआयुक्त तथा प्रशासक, जालना शहर महानगरपालिका व उपायुक्त नंदा गायकवाड यांच्यावतीने जाहीर आव्हान प्रसिद्धीपत्रक काढण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### महाराष्ट्रात महायुतीच्या सत्ता

झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, भाजप नेत्या पंकजाताई मुंडे, माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांनी राबविलेल्या संकल्पना आणि योजनांना मुस्लिम समाजाने स्विकारले. महाविकास आघाडीने मुस्लिम समाजाचा केवळ व्होट बँक म्हणून वापर केला. यावेळी विधानसभा निवडणुकीतही जातीच्या आधारावर मोठी पत्रकबाजी झाली. मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावनेला हात घालून त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाला मात्र मुस्लिम समाज विकासाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला. त्यामुळेच व्होट बँकेचे राजकारण आणि धार्मिक पत्रक बाजी झुगारून मुस्लिम समाजाने भाजप महायुतीची सत्ता स्थापन करण्यात महत्त्वाचा वाटा उचलला आहे. भविष्यातही मुस्लिम समाज यापेक्षा अधिक प्रमाणात विकासाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील असा विश्वास प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी व्यक्त केला आहे.

### मराठी पत्रकार परिषदेच्या

माजलगाव, परळी, अंबाजोगाई, धारूर, वडवणी, केज, आष्टी, पाटोदा, शिरूर(का.) या तालुक्यातून मराठी पत्रकार परिषद ने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आपल्या परिवाराच्या व स्वतःच्या आरोग्याच्या मोफत तपासण्या करून घेतल्या आहेत. व जवळपास १ हजारांच्या वर या शिबिरात रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.

यावेळी मराठी पत्रकार परिषद चे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर, बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात,मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संजय हंगे, जिल्हा उपाध्यक्ष रवी उबाळे, बीड तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत,तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, अशोक खाडे,अनिल जाधव आदींनी उपस्थिती होती.

पत्रकारांचे आरोग्य शिबीर सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत पार पडले यात बीड जिल्हा रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टरांनी सर्व पत्रकार बांधवांच्या तपासण्या केल्या यात डॉ.शहाणे,डॉ. पारखे, डॉ. काळे, डॉ.राऊत, व रक्त संक्रमण अधिकारी डॉ. कट्टे मॅडम,डॉ.नाईकवाडे मॅडम,डॉ.रोहिणी सवासे मॅडम तसेच रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी श्रीमती गालफाडे, रक्तपेढी तंत्रज्ञ सचिन स्त्कर, विनोद रावतळे, विनय कुंभार, सेवक दिलीप औसरमल या खूप मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले

या शिबीराचा बीड तालुक्यातील सर्व पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबीयांनी लाभ घेतला.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या मार्गदशनाखाली संभाजीनगर विभागीय समन्वयक सुभाष चौरे, परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा परिषदे प्रमुख संजय हंगे ,जिल्हा उपाधयक्ष रवी उबाळे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यु घरत, संपादक राजेंद्र होळकर, हल्ला विरोधी कृती समितीचे तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, बीड तालुकाध्यक्ष दत्ता आजबे, कार्याध्यक्ष रेहान शेख, कोषाध्यक्ष प्रशांत लहुरीकर, सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींनी परिश्रम घेतले.

### समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी

व पोटजाती यांचा दुसरा वधू-वर परिचय मेळावा मोठ्या थाटात संपन्न झाला. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे पूर्वाचार्य लिंगैक्य प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचा तृतीय जयंतीनिमित्त विविध धार्मिक विधी आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज आपल्या आशीर्वचनात म्हणाले, सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वीरशैव लिंगायत समाजाने इतर समाजाच्या तुलनेत आदर्श निर्माण करावा जेणेकरून समाजाचे हित होईल, असे आवाहन मठाधिपती यांनी केले. श्री संस्थान मठात सकाळी ८ वाजता ते १० वाजता लिंगैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचे समाधीस रूद्राभिषेक, १० वाजता आरती व श्रीगुरूंचे आशिर्वचन व वधू-वर परिचय मेळावा झाला. वधू-वर परिचय मेळावा यशस्वी करण्यासाठी

डॉ.गजाननआप्पा होन्ना, मनोहरअप्पा जामकर, कैलासआप्पा खुर्पे, राजाभाऊआप्पा लोखंडे, सुचेंद्रअप्पा महाजन, नितीनअप्पा शेटे, संजयअप्पा मोगरेकर, विकासआप्पा पाटील, प्रशांतआप्पा शेटे, रामेश्वरआप्पा काटकर, कैलासआप्पा लांडगे, सुरेशआप्पा कुरूळे, गणेश तोडकरी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव पेठकर यांनी केले. तर वधू-वरांचा परिचय प्रा.गजानन होन्ना यांनी उपस्थितांना करून दिला.

लवकरच सामुहिक विवाह सोहळा आयोजन

सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगावच्या वतीने यंदाही भव्य स्वरूपात वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातीतील वधू-वर परिचय मेळाव्याचे सोमवारी आयोजन करण्यात आला होते. काळाबरोबर सामाजिक बांधिलकीचा वसा घेत मठातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आजमितीला समाजाच्या हितासाठी वधू-वर परिचय मेळावा आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली. दरम्यान, येत्या ३१ डिसेंबरपर्यंत वधू-वरांची नोंदणी करता येईल, लवकरच सामुहिक विवाह सोहळ्याचेही होणार असल्याचे श्री संस्थान मठा माजलगाव तर्फे कळविण्यात आले आहे.

### राज्यमंत्रिपदाचा अनुभव

आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे.मागील तीस वर्षांमध्ये आ.प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली आहेत. विद्यार्थ्यांचे,सुशिक्षित बेरोजगारांचे, त्याचप्रमाणे जलसिंचनाचे,अनेक प्रश्न मार्गी लावल्याने बहुतांशी शेतकरी आज समृध्द झाला आहे. विकासाचे अनेक कामे झाली आहेत.उर्वरित विकासाचा जो बॅकलॉग भरून काढायचा आहे, तोही आ.प्रकाश सोळंकेच काढू शकतात.विकासाची दूरदृष्टी त्यांच्याकडे आहे.मंत्री पदाचा अनुभवही त्यांच्याकडे आहे त्यामुळे आ.प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागणी बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे व उपसभापती श्रीहरी मोरे यांनी शिष्टमंडळाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.

### केज मतदारसंघात

काम करण्यात येईल. यासोबतच आपेगाव, कुंबेफळ (ता. अंबाजोगाई), आडस, केज, धनेगाव (ता. केज) या ३३ के.व्ही. उपकेंद्रातील दुरूस्ती कामे करण्यात येणार आहेत. सदरील कामे पूर्णत्वास गेल्यानंतर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यानिमित्ताने शेतकऱ्यांची मोठी अडचण दूर करून त्यांना दिलासा दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

### दिव्यांगांच्या योजना पात्र

जागातिक दिव्यांग दिनानिमित्त रॅली

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत रॅली काढण्यात आली. रॅलीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी हिरवा झेंडा दाखवला. रॅलीत सहभागी सर्व शिक्षक, नागरिक, दिव्यांग विविध शाळेतील विद्यार्थी व विविध दिव्यांग संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होते.

cmyk

# पीकविम्यासाठी तुपकरांची कृषी कार्यालयात धडक

बुलडाणा : गेल्या वर्षीच्या पीकविम्यापासून वंचित असलेल्या पात्र-अपात्र शेतकऱ्यांना तातडीने पिकविमा द्यावा, या मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेते संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात शेतकऱ्यांसह धडक दिली.

बुलडाणा जिल्ह्यात पीकविमा कंपनीने गेल्या वर्षीच्या रब्बी हंगामातील पोस्ट हार्वेस्टिंगअंतर्गत पात्र असलेल्या व चुकीचे कारण दाखवून अपात्र केलेल्या एक लाख २६ हजार २६९ शेतकऱ्यांना अद्याप पीकविम्याचा मोबदला दिला नाही. त्याचबरोबर खरीप हंगामात चुकीची कारणे देऊन अपात्र केलेल्या ७० हजार ८३१ शेतकऱ्यांना पीकविमा देण्याचे कंपनीने मान्य केले आहे.


'त्या' शेतकऱ्यांनाही कंपनीने अद्याप पीकविम्याचा मोबदला दिला नाही. पीकविम्यापोटी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २३५ कोटी ५५ लाख



रुपये रक्कम मिळणे अद्याप बाकी आहे. तातडीने ही रक्कम शेतकऱ्यांना मिळावी, अशी आमची मागणी आहे. परंतु शासनाकडून उर्वरित हिस्सा मिळाल्यानंतरच या वंचित शेतकऱ्यांची पीकविमा रक्कम जमा करू, असे कंपनीकडून सांगितले जात आहे. त्यामुळे तातडीने शासन स्तरावर पाठपुरावा करून वंचित शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करावी, अशी मागणी तुपकर यांनी जिल्हा कृषी अधीक्षक मनोज ढगे यांच्याकडे केली. आचारसंहितेमुळे आम्ही शांत होतो, आता आचारसंहिता संपली आहे, त्यामुळे येत्या आठ दिवसांत वंचित पात्र-अपात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर पीकविमा जमा करा, अन्यथ आक्रमक आंदोलन करणार असल्याचा इशारा तुपकर यांनी दिला.

या वेळी विनायक सरनाईक, नितीन राजपूत, आकाश माळोदे, अमोल मोरे, रामेश्वर अंभोरे, गजाननबाप्पू देशमूख, राहुल शेलार, महेंद जाधव, उमेशसिंग राजपूत, सदाशिव जाधव, भागवत धोरण, विजय बोराडे, गजानन कुटे, सतीश सुरडकर, संतोष शेळके यांच्यासह क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

## यंदा आले पिकाचा हंगाम चांगला, पण दर घसरले



पुणे : शेतकऱ्यांसमोर आले उत्पादनातील दर घसरणीमुळे मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. सध्याच्या परिस्थितीत आले पिकाचे दर निम्म्याहून कमी झाले असून शेतकऱ्यांना आपला माल विकण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. मागील महिन्यापासून आले दरांमध्ये सुरु झालेली घसरण शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

सध्या आले पिकास प्रतिगाडी (५०० किलो) फक्त १२ ते १५ हजार रुपये दर मिळत आहे, जो मागील महिन्याच्या तुलनेत निम्म्याहून कमी आहे. मागील दोन वर्षांत शेतकऱ्यांना आलेसाठी १०० ते १२५ रुपये प्रतिकिलो दर मिळत होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आले लागवड केली. मात्र, यावर्षी दमदार पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचल्याने कंदकुज मोठ्या प्रमाणावर झाली. यामुळे ३० ते ३५ टक्के आले पिकाचे क्षेत्र बाधित झाले आहे.

शेतकऱ्यांचे खर्च वाढते : कंदकुज टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी औषध फवारणीसारखे विविध प्रयत्न केले, ज्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च वाढला आहे. याशिवाय दरातील घट आणि कंदकुजमुळे शेतकऱ्यांना पिक लवकर काढावे लागत आहे. व्यापारी कमी दरात आले विकत घेत असून काहींनी खरेदी पूर्णपणे थांबवली आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर येणारे व्यापारी आवक वाढल्याचे कारण सांगत दर कमी करत आहेत, पण शेतकऱ्यांत हा दर कमी करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम असल्याची चर्चा आहे.

कंदकुज आणि माल विक्रीची अडचण : कंदकुज झाल्याने आले पीक जास्त दिवस जमिनीत ठेवणे शक्य होत नाही. त्यामुळे शेतकरी चांगल्या मालाचे नुकसान टाळण्यासाठी मिळेल त्या दरात आले विकायला बाध्य आहेत. शेतकऱ्यांची ही स्थिती अत्यंत गंभीर असून त्यांना योग्य तो न्याय मिळण्याची गरज आहे.

दर घट कृत्रिम...? आले पिकाच्या दरात झालेली घट कृत्रिम असल्याचा संशय शेतकऱ्यांत व्यक्त होत आहे. व्यापारी मोठ्या प्रमाणावर खरेदी बंद करत असून दर कमी करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम राबवत असल्याचेही शेतकऱ्यांत बोलले जात आहे.

उपाय आणि अपेक्षा : शेतकऱ्यांनी केलेल्या मेहनतीला योग्य मोबदला मिळावा यासाठी सरकारने पुढाकार घेऊन दरांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. याशिवाय स्थानिक पातळीवर बाजारपेठा स्थिर करण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या या समस्येकडे लक्ष देऊन त्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

## मेंढीच्या गोठ्यातील संसर्ग थांबवण्यासाठी उपाय

विशेषत: मेंढ्या-शेळीपालनात त्यांची मुले हा पशुपालकांचा नफा असल्याचे पशुतज्ज्ञ सांगतात. मात्र थोड्याशा निष्काळजीपणामुळे बालकांच्या मृत्यूचे प्रमाणही जास्त आहे. परंतु वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करून मृत्यूदरही शून्यावर आणता येतो. प्राणी जितका निरोगी राहील, म्हणजेच रोगांपासून दूर तितके त्याचे उत्पादन वाढेल. शिवाय पशुपालनाचा खर्चही कमी होईल. हे सर्व प्रकारच्या पशुपालनाच्या संदर्भात पशु तज्ञांनी सांगितले आहे. तुम्ही गायी-म्हशी पाळता किंवा शेळ्या-मेंढ्या. परंतु, जर मेंढ्या आणि शेळ्यांबद्दल बोलायचे झाले तर, तज्ञांच्या मते, पाच प्रमुख कारणे आहेत ज्यामुळे शेतीमध्ये संसर्ग पसरतो. मात्र, शेतातील दैनंदिन जीवनात काही गोष्टींचा समावेश केल्यास असे संक्रमण टाळता येऊ शकते. यासाठी जैवसुरक्षा मानकेही स्वीकारली जाऊ शकतात, परंतु असे केल्याने पशुपालनाचा खर्च वाढतो. तर उपायांचा



अवलंब करताना एक रुपयाही खर्च होत नाही. आणि एवढेच नाही तर असे केल्याने झुनोटिक रोगांचा धोकाही टाळता येतो.

रोग उद्भवण्याची आणि पसरण्याची कारणे : प्राण्यांपासून - जनावरे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उत्पादनासाठी पाठवून. संक्रमित जनावरांच्या मृतदेहांची अयोग्य विल्हेवाट लावल्यामुळे गट भागात जनावरांचे हस्तांतर. जनावरांकडून शेतात येणारी दूषित माती आणि खत. मानवाकडून - शेतावर काम करणाऱ्या आणि तिथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून. कंत्राटदार, पर्यवेक्षक, शेजारी आणि शेताला भेट देणारे लोक. हात, शूज, कपडे, केस इत्यादींमधून येणारी दूषित माती आणि खत. वाहने आणि उपकरणे- फार्म कार, ट्रक, ट्रॅक्टर, वजनाची यंत्रे, डिप्स, एआय गन आणि लसीकरण उपकरणे. चारा आणि पाणी- चारा तयार केल्यानंतर चारा आणि खनिज संबंधित कच्च्या मालाची वाहतूक आणि साठवणूक. शेतातील प्राणी किंवा इतर कोणत्याही प्राण्याच्या मलमूत्रामुळे. कीटक आणि तण- विषारी आणि अवांछित वनस्पती. वन्य प्राणी. पाळीव प्राणी पासून. शेतातील उंदरांपासून. शेतातील कीटकांपासून.

## डाळिंब बागेत फुल, फळधारणा अवस्थेतील रसशोषक किडींचे नियंत्रण

डाळिंब बागेत मृगबहार अवस्थेत फुलधारणा आणि फळधारणा होताना फुलकिडी, मावा, पांढरी माशी यासारख्या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. या रसशोषक किडींवर वेळील नियंत्रण ठेवले तर त्याचा चांगला फायदा होतो.

एकात्मिक नियंत्रण उपाय : बागेत स्वच्छता राखावी, तणांचे वेळीच नियंत्रण करावे. झाडाच्या शेंड्याच्या १५ सेंटिमीटर खाली नागमोडी पद्धतीने पिवळे/निळे चिकट सापळे २५-३० सापळे प्रति एकर याप्रमाणात लावावेत. रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी पहिली फवारणी स्पिनेटोरम १२% एससी १.० मिली/लिटर किंवा स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटर पाणी + ०.२५ मिली/लिटर स्प्रेडर स्टिकर याप्रमाणात फवारणी करावी. रसशोषक किडींसाठी दुसरी



फवारणी पहिल्या फवारणीनंतर ७-१० दिवसांनी, स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटरची दुसरी फवारणी किंवा निंबोळी तेल १% (१०००० पीपीएम) ३.० मिली/लिटर किंवा पोंगामिया तेल (करंज तेल) ३ मिली/लिटर किंवा नीमतेल + पोंगामिया तेल प्रत्येकी ३ मिली/लिटर + ०.३ मिली/लिटर स्प्रेडर स्टिकरच्या मिसळून फवारणी करावी. तिसरी फवारणी स्पिनेटोरम १२% एससी १.० मिली/लिटर किंवा स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटर + ०.२५ मिली /लिटर स्प्रेडर स्टिकर मिसळून फवारणी करावी. सायंकाळच्या वेळी बागेत धूर करावा. रस शोषक किडीवर उपजीविका करणाऱ्या परोपजीवी किडींचे (क्रायसोपर्ला, ढालकीडा, क्रिप्टोलेमस, सिरफिड माशी इ.) संवर्धन करावे.

## शेवगा शेती, वाढत्या मागणीमुळे शेंगांचे दर आकाशाला भिडले..!


सध्या शेवग्याच्या शेंगा आणि पानांची मागणी वाढत आहे, कारण याचे आरोग्यदायी फायदे लोकांपर्यंत पोहोचले आहेत. शेवग्याचा उपयोग केवळ आहारासाठीच नव्हे, तर औषधी गुणधर्मांसाठी देखील केला जातो. शेवगा शेतीतून कमी वेळात अधिक उत्पादन आणि चांगले आर्थिक लाभ मिळवण्याची संधी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध आहे.

शेवग्याची बाजारपेठेत वाढती मागणी : शेवग्याच्या शेंगांची मागणी ढाबा, हॉटेल आणि घरोघरी मोठ्या प्रमाणात आहे. शेवगा हंडी, शेवगा फ्राय, आणि शेवग्याच्या पानांची भाजी यासारख्या पदार्थांची लोकप्रियता वाढत आहे. यामुळे शेवग्याच्या शेंगांचे दरही अधिक मिळू लागले आहेत. मात्र सध्या बाजारात शेवग्याची शेंगा दुर्मिळ झाल्यामुळे त्याच्या किमतीत वाढ झाली आहे.

शेवग्याच्या शेतीचे फायदे : कमी भांडवलात अधिक नफा, शेवगा पिकवण्यासाठी कमी खर्च लागतो, परंतु त्याच्या शेंगा आणि पानांना चांगला भाव मिळतो.

झपाट्याने उत्पादन : शेवग्याचे झाड एकदा लावल्यावर लगेच उत्पादन देण्यास सुरुवात करते. हे झाड टिकाऊ असल्याने दीर्घकाळ उत्पन्न मिळते.

संपूर्ण झाड उपयोगी : शेंगा शिजवून किंवा



भाजून खाल्ल्या जातात, तसेच हॉटेल्स आणि ढाब्यांमध्ये शेवग्याच्या पदार्थांना मागणी आहे. पाने ही औषधी आणि आरोग्यवर्धक.

फुले आणि मुळे औषधांमध्ये वापरली जातात.

आरोग्यदायी फायदे : शेवग्याच्या पानांत प्रोटीन, कॅल्शियम, फायबर, आणि विटामिन्स भरपूर प्रमाणात असतात. त्याचा उपयोग औषधनिर्मितीत होत असल्याने, पानांचेही चांगले दर मिळतात.

शेवगा लागवडीत लक्ष द्यायच्या गोष्टी : मोकळ्या आणि सुपीक जमिनीत शेवगा लागवड करा. कमी पाण्यातही शेवग्याचे उत्पादन चांगले होते, त्यामुळे कमी जलस्रोत असलेल्या भागातही ही शेती फायदेशीर ठरते. रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय खतांचा वापर केल्यास उत्पादनाचा दर्जा सुधारतो.

भविष्यासाठी शेवग्याची शेती कशी फायदेशीर? शेवग्याच्या पानांचे पावडर, तेल आणि औषधांमध्ये उपयोग वाढल्यामुळे निर्यात व्यवसायासाठी संधी आहे. शेवग्याच्या झाडांमुळे शेतकऱ्यांना दीर्घकाळ आर्थिक स्थैर्य मिळते.

शेवगा उत्पादकांसाठी सल्ला : शेवग्याच्या शेंगांचे योग्य वेळी तोड करून बाजारात पाठवा. पानांपासून पूड बनवून स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये विक्री करा. सेंद्रिय शेतीत शेवग्याचा समावेश केल्यास शेतीच्या दर्जात सुधारणा होईल. शेवग्याची शेती ही शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरू शकते. त्याच्या शेंगा, पाने, आणि अन्य भागांना बाजारपेठेत मागणी आहे. कमी गुंतवणुकीत जास्त नफा देणाऱ्या शेवग्याच्या शेतीकडे शेतकऱ्यांनी लक्ष द्यावे, यामुळे शेतीचे उत्पन्न निश्चितच वाढू शकते.




### जागतिक दिवस: भारतीय नौसेना दिन

### महत्वाच्या घटना

१७७१ : दऑब्जर्व्हर हे जगातील पहिले रविवार वृत्तपत्र प्रकाशित झाले.
१८२९ : भारतीयांचा कट्टर विरोध असूनही लॉर्ड बेंटिंगने जाहीरनामा काढून सतीच्या प्रथेला मदत करणाऱ्यांना खुनी ठरवले जाईल असा कायदा केला. तसेच सतीप्रथा बंद केली.
१८८१ : लॉस एॅन्जेलिस टाइम्स वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१८८८ : भारताचे प्रसिद्ध इतिहासकार रमेश चंद्र मजूमदार यांचा जन्म.
१९२४ : मुंबईतील 'गेटवे ऑफ इंडिया'चे उद्घाटन झाले.
१९४८ : भारतीय लष्कराचे सरसेनापती म्हणून जनरल करिअप्पा यांची नेमणूक झाली. त्यांनी १५ जानेवारी १९४९ रोजी ब्रिटिशांकडुन भारतीय सेनेची सूत्रे हाती घेतली.
१९५९ : ला भारत आणि नेपाल मध्ये गंडक सिंचन व विद्युत प्रकल्पांवर सह्या झाल्या.
१९६७ : थुंबा येथील तळावरुन 'रोहिणी' या पहिल्या भारतीय अग्निबाणाचे यशस्वी उड्डाण
१९७१ : भारतीय नौदलाने कराचीतील पाकिस्तानी नौदलावर हल्ला केला.
१९७१ : ला भारत आणि पाकिस्तान बिघडत्या संबंधांना पाहून संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने आपत्काल मध्ये बैठक बोलावली होती.
१९७५ : सुरीनामचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९१ : पॅन अॅम या अमेरिकन विमानकंपनीने दिवाळखोरी जाहीर केली.
१९९३ : उस्ताद झिया फरिदुद्दीन डागर आणि पंडित एस. सी. आर. भट यांना मध्यप्रदेश सरकारचा 'तानसेन सन्मान' जाहीर
१९९६ : ला अमेरिकेच्या नासाने मार्स पाथफ़ाउंडर नावाचे अवकाशयानमंगळावरपाठवले होते.
१९९७ : संगीत दिग्दर्शक कल्याणजी-आनंदजी यांना मध्यप्रदेश सरकारचा 'लता मंगेशकर पुरस्कार' प्रदान
२००३ : अशोक गहलोत १२ व्या विधानसभेसाठी निवडल्या गेले होते.
२००४ : मारिया ज्युलिया मॅन्टीला हिने मिस वर्ल्ड चा पुरस्कार जिंकला होता.
२००८ : मध्ये लोकप्रिय रोमिला थापर यांना क्लूज पुरस्कारासाठी निवडल्या गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३५ : सॅम्युअल बटलर इंग्लिश लेखक (मृत्यू: १८ जून १९०२)
१८५२ : रशियन भौतिकशास्त्रज्ञ ओरेस्ट ख्वोल्सन यांचा जन्म.
१८६१ : आइसलँड देशाचे पहिले पंतप्रधान हंगेस हफस्टाइन यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर १९२२)
१८९२ : स्पेनचा हुकुमशहा फ्रान्सिस्को फ्रँको यांचा जन्म.
१८९८ : मध्ये भौतिकशास्त्राचे शास्त्रज्ञ श्रीनिवास कृष्णन यांचा जन्म.
१९१० : आर. वेंकटरमण भारताचे ८ वे राष्ट्रपती, केन्द्रीय मंत्री, कायदेपंडित, स्वातंत्र्यसेनानी (मृत्यू: २७ जानेवारी २००९)
१९१० : मोतीलाल राजवंश ऊर्फ 'मोतीलाल' आपल्या ऐटबाज व्यक्तिमत्त्वाने व सहजसुंदर अभिनयाने रसिकांवर मोहिनी घालणारे अभिनेते (मृत्यू: १७ जून १९६५)
१९१० : मध्ये भारतीय क्रिकेटर अमर सिंग यांचा जन्म.
१९१६ : बळवंत गार्गी पंजाबी नाटककार, दिग्दर्शक, कादंबरीकार व लघुकथाकार, पंजाब विद्यापीठातील भारतीय रंगभूमी विभागाचे प्रमुख, 'थिएटर ऑफ इंडिया' आणि 'फोक थिएटर ऑफ इंडिया' या पुस्तकांचे लेखक (मृत्यू: २२ एप्रिल २००३ मुंबई)
१९१९ : इंदर कुमार गुजराल - भारताचे १२ वे पंतप्रधान (मृत्यू: ३० नोव्हेंबर २०१२)
१९३२ : दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष रोह तै-वू यांचा जन्म.
१९३५ : शंकर काशिनाथ बोडस पंडित विष्णू दिगंबर पलुसकर यांच्या परंपरेतील गायक (मृत्यू: २० जुलै १९९५)
१९४३ : मराठी लेखक कॅथोलिक ख्रिस्ती फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचा जन्म.
१९६२ : मध्ये लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांचा जन्म.
१९६३ : मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीचे कलाकार जावेद जाफरी यांचा जन्म.
१९७७ : भारतीय क्रिकेटर अजित आगरकर यांचा जन्म.
१९७९ : देशाच्या धावपटू सुनीता रानी यांचा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५० : विद्युत मोटरचे शोधक विल्यम स्टर्जन यांचे निधन. (जन्म: २२ मे १७८३)
१९०२ : डो जोन्स एंड कंपनी चे सहसंस्थापक चार्ल्स डो यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १८५१)
११३१ : ओमर खय्याम - पर्शियन तत्त्वज्ञ, गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ आणि कवी (जन्म: १८ मे १०४८)
१९६२ : हास्य कवी अन्नपूर्णानंद यांचे निधन.
१९७३ : कवी गिरीश तथा शंकर केशव कानेटकर यांचे निधन. (जन्म: २८ ऑक्टोबर १८९३)
१९७५ : जर्मन तत्त्वज्ञ आणि लेखक हाना आरेंट यांचे निधन.
१९८१ : मराठी चित्रकार ज. ड. गोंधळेकर यांचे निधन.
२००० : सुरिनाम प्रजासत्ताकचे पहिले पंतप्रधान हेन्क अर्रोन यांचे निधन. (जन्म: २५ एप्रिल १९३६)
२०१४ : भारतीय वकील आणि न्यायाधीश व्ही. आर. कृष्ण अय्यर यांचे निधन. (जन्म: १५ नोव्हेंबर १९१५)
२०१७ : भारतीय चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध कलाकार शशी कपूर यांचे निधन.

# बस स्थानक परीसर, साठे चौक, नगर रोडवरील अतिक्रमण हटवले





## वाहतूक शाखेची बीड शहरात कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बस स्थानक परीसर, साठे चौक आणि नगर रोडवर असलेली अतिक्रमण साईन बोर्ड, शेड, समोर आलेले अँगल वाहतूक शाखेच्या पोलिसांनी हटवले ही कारवाई शुक्रवारी करण्यात आली. व्यापाऱ्यांनी स्वतःहून आपापली अतिक्रमणे आठवावेत असे आवाहन वाहतूक शाखेचे स.पो.नी.सुभाष सानप यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसापासून बीड शहर बस स्थानक परीसर,साठे चौक आणि नगर रोड परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढल्याच्या तक्रारी येत होत्या. या तक्रारीवरून वाहतूक शाखेचे स.पो.नि. सुभाष सानप व त्यांच्या टीमने या भागातील साईन बोर्ड, अँगल आदी अतिक्रमणे हटवली. ही कारवाई सपोनी. सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हेड कॉन्स्टेबल रवींद्र नागरगोजे, संजय घोडके, बाळासाहेब नागरगोजे, गोविंद सारुक, पांडुरंग दराडे ,पोलीस नाईक आदिनाथ मुंडे, नितीन काकडे, मिलिंद सारणीकर पोलीस वाहन चालक वाघमारे यांनी संयुक्तपणे केली. यापुढेही कारवाई सुरूच राहणार असून कोणीही रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करू नये, अतिक्रमण धारकांनी आपापले साईन बोर्ड, शेड स्वतःहून काढून घ्यावेत असे आवाहन स.पो.नि. सुभाष सानप यांनी केले आहे. या कारवाईचे बीड शहर वासीयांकडून स्वागत होत असून शहरात झालेली अतिक्रमण ही वाहतुकीस अडथळा निर्माण करतात आणि पर्यायाने अपघातास कारणीभूत ठरतात. त्यामुळे व्यापाऱ्यांनी स्वतःहून याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

### अतिक्रमणे स्वतःहून काढून घ्या- सानप

शहरात वारंवार अतिक्रमणे वाढत असुन या विरुद्ध वारंवार कारवाई करावी लागते. व्यापाऱ्यांनी स्वतःहून आपापली अतिक्रमणे काढून घ्यावीत आपले शेड ,साइन बोर्ड, अँगल स्वतःहून हटवावेत असे आवाहन सं.पो.नि. सुभाष सानप यांनी केले असून जर स्वतःहून अतिक्रमणे हटवलली नाहीत तर शहर वाहतूक शाखा कारवाई करेल. असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## थोडक्यात



### घाटनांदुर येथे महाराजा यशवंतराव होळकर यांची जयंती साजरी

घाटनांदुर : येथे स्वातंत्र्य सूर्य भारताचा महाराजा यशवंतराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त दि ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वा खंडोबा मंदिर या ठिकाणी महाराजा यशवंतराव होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ फोडून व पुष्पहार अर्पण करून सर्व समाज बांधवांच्या वतीने अभिवादन करण्यात आले यावेळी नाना वैद्य, राम चांगीरे ,महादेव शिंदे, राम वालेकर ,रामभाऊ वैद्य , व्यंकटी गाढवे ,नितेश वैद्य,संतोष गाढवे, पत्रकार परमेश्वर वैद्य,प्रदीप वैद्य, राजेभाऊ वैद्य ,बालाजी वैद्य ,अशोक गाढवे ,प्रशांत वैद्य, व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात जागतिक एड्स दिन साजरा

पाटोदा । प्रतिनिधी


येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन उत्साहात साजरा करण्यात



आला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आरोग्य समितीच्या संयुक्त विद्यमाने एड्स दिनानिमित्त आयोजित विशेष अतिथी व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. के. टी. सानप उपस्थित होते. व्यासपीठावर कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. के. टी. सानप यांनी उपस्थितांना एचआयव्ही व एड्सविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य आबासाहेब हांगे यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जालिंदर लोणके यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. अजिंक्य साखरे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### पिंपळवंडी परिसरात बिबट्याचे दर्शन

पिंपळवंडी : पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे बीड-अंमळनेर-अहमदनगर या मार्गावर कातरओढा परिसरात दि.२९/११/२०२४ शुक्रवार रोजी सायंकाळी सहा वाजेच्या दरम्यान एका चारचाकी पिक-अप वाहन चालकाला अंमळनेर येथून वाहन घेऊन येत असताना वाहनासमोर बिबट्या सदृश्य प्राणी दिसल्याने गावात व परिसरात भितीचे



वातावरण निर्माण झाले आहे.सध्या शेतीचे कामे चालू असून शेतकऱ्यांना व लोकांना शेतात दिवसा व रात्री जावे लागते. रात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतकरी जीव मुठीत धरून कामे करीत आहेत.तीन-चार दिवसापूर्वी बिबट्या सदृश्य प्राणी दिसल्याचा प्रकार घडला आहे.पण कोठेही या प्राण्याने हिंसा केल्याची वार्ता ऐकावयास मिळालेली नाही.

## अंमळनेर -पिंपळवंडी परिसरात ढगाळ वातावरणामुळे रब्बी पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव

पिंपळवंडी । प्रतिनिधी

या वर्षी पिका योग्य चांगला पाऊस पडल्याने रब्बी पिके जोमदार आले आहेत.तूर,हरभरा,गहू,ज्वारी,राजमा इत्यादी रब्बी पिके पाटोदा तालुक्यातील अंमळनेर-पिंपळवंडी शेती शिवारात जोमाने डोलत असलेली पाहवयास मिळत आहेत. परंतु, गेल्या दोन-तीन दिवसापासून झालेल्या हवामान बदलामुळे व ढगाळ वातावरणामुळे रब्बीची पिके आता रोगाच्या प्रादुर्भावाच्या विळख्यात सापडल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.तुरीच्या पिकावर मोठ्या प्रमाणात आळ्याचा प्रादुर्भाव व उसावर लोकरी मावा आणि ज्वारीवर चिकटा रोग पडल्याने हाता-तोंडाशी आलेला घास वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे.परिसरात कधी थंडी व कधी ढगाळ वातावरणामुळे किड रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे.

अळीच्या प्रादुर्भावामुळे तूर पिकाच्या उत्पन्नात मोठी घट येऊन आर्थिक नुकसानीचा फटका बसण्याची शेतकरी भावना व्यक्त करीत आहेत.महाग मोलाचे बियाणे व खते खरेदी करून शेतकरी शेती उत्पादन घेण्यासाठी रात्रंदिवस शेतात राबत राहतो.एवढे काबड कष्ट करूनही त्याच्यापुढे नैसर्गिक संकटे उभे राहतात.त्या संकटाशी सामना करताना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.ढगाळ वातावरणाच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांना परत फवारणीसाठी खर्च करण्यासाठी भुर्दंड सहन करण्याची वेळ आली आहे.कापूस व सोयाबीनला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यात नाराजीचा सूर निघत आहे.कापसाला योग्य भाव नसल्याने अनेक शेतकऱ्यांचा कापूस घरातच पडून आहे.

## खा.बजरंग सोनावणेंच्या आक्षेपार्ह वक्तव्याची शरद पवारांकडे तक्रार

बीड । प्रतिनिधी

बीडचे खा.बजरंग सोनावणे यांनी बीडचे नवनिर्वाचित आ.संदिप क्षीरसागर यांच्या बीड करांच्या वतीने '' नागरी सत्कार सभेत'' पत्रकारांची बायको,त्यांची मुलं काढुन आपल्यातील असभ्यतेचे दर्शन घडवत पत्रकारांच्या कुटुबियांचा अवमान केला असुन महिलांचा सन्मान करणा-या आणि महिला कार्याध्यक्ष असलेल्या पक्षाचे वरिष्ठ नेते संस्थापक,राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, कार्याध्यक्ष तथा लोकसभेच्या नेत्या सुप्रिया सुळे, पक्षाचे सचिव जितेंद्र आव्हाड, सरचिटणीस जयंत पाटील यांना सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी ईमेल द्वारे तक्रार करत खा.बजरंग सोनावणे यांना समज देऊन पत्रकारांची माफी मागायला लावावी अशी मागणी केली आहे.



दैनिक लोकमत सारख्या नामांकित दैनिकात दि.२७ नोव्हेंबर रोजीच्या अंकात केज विधानसभेच्या निकालावरून खा.बजरंग सोनावणे यांच्या भुमिकेवर संशय व्यक्त करणारी बातमी प्रसिद्ध केली होती.या बातमीच्या अनुषंगाने खा.बजरंग सोनावणे यांनी बीडमध्ये आ.संदिप क्षीरसागर हे दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांचा जाहीर नागरी सत्काराच्या कार्यक्रमात बोलताना सोनावणे म्हणाले '' संशय तुझ्या बायकोला आला? पोराला आला? का अन्य कुणाला आला? कारण बजरंग सोनावणे केजमध्ये फॉर्म भरायला नव्हते म्हणून त्या पत्रकाराला संशय आला '' असे म्हणत एवढ्यावरच न थांबता सगळे पत्रकार सत्तेच्या बाजुने आहेत असा शिक्काही सोनावणे यांनी पत्रकारांना मारला वरतुन'' सत्य लिहा '' असा उपदेशही केला. त्यामुळे पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांनी खा.बजरंग सोनावणे यांना समज देऊन पत्रकारांची जाहीर माफी मागायला लावावी अशी मागणी करण्यात आली आहे. जाहीर कार्यक्रमात पत्रकारांच्या कुटुंबियांचा केवळ आक्षेपार्ह भाषेत अवमान करूनच खा.बजरंग सोनावणे थांबले नाहीत तर त्यांनी पत्रकार हे लोकसभेचा चौथा आधारस्तंभ आहेत असा जावई शोध लावला आहे. त्यांच्या या वक्तव्याची जिल्हाभर चांगलीच चर्चा रंगली असुन त्यांच्या विरोधात केवळ पत्रकारच नव्हे तर सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्यांतुन सोशल मीडियावर टीकेची झोड उठवली जात असुन त्यांनी पत्रकारांची तातडीने माफी मागुन हा विषय संपवावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अट्टल महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थिनींची निवड

गेवराई । प्रतिनिधी

जगदंबा आयटीआय गेवराई येथे पार पडलेल्या विभागीय शालेय खो खो स्पर्धेत गेवराई येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी आर्या कांबळे, गायत्री बोरकर आणि स्नेहा पवार यांची निवड झाली आहे. धुळे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय खो-खो निवड चाचणी स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अमरसिंह पंडित, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य आणि प्राचार्य डॉ. रजनी शिखरे



यांनी अभिनंदन केले. खेळाडू विद्यार्थिनींच्या पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यासाठी उपप्राचार्य डॉ. विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेंद्र राऊत, पर्यवेक्षक गोरे, वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख प्रा. अरुण भराडे, प्रा. रवींद्र खरात, प्रा. अमित फुलारे, खो -खो प्रशिक्षक विजय जाहेर, प्रा. राजेंद्र बरकसे आदींची उपस्थिती होती.

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात एड्स जनजागृती रॅली संपन्न



नेकनूर। प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर व स्त्री व कुटीर रूग्णालय, नेकनूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब अंतर्गत एड्स जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. हुबेकर ए. आर., डॉ. मुख्तार शेख, समुपदेशक गोरे एस. एस., आय टी टेक्निशियन स्वाती मोहोळकर लॅब टेक्निशियन रियाज शेख, बाळकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती. जागतिक एड्स दिनानिमित्त काढण्यात आलेली एड्स जनजागृती रॅली महाविद्यालयापासून स्त्री व कुटीर रुग्णालया पर्यंत काढण्यात आली. सदरील रॅलीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डी. के. ढास यांनी मार्गदर्शन केले या रॅलीचे संचलन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अंकुश काळे, डॉ. राजेश आरदवाड यांनी केले. यावेळी महाविद्यायातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सत्यशोधक समाजातर्फे ॲड. सुभाष निकम सन्मानित

गेवराई । प्रतिनिधी

महात्मा ज्योतीराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे ४२ वे राज्यस्तरीय अधिवेशन अहिल्यानगर येथे दिनांक ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर दरम्यान संपन्न झाले.सत्यशोधक कवी संमेलन , महिलांची वर्तमान स्थिती , शेतकरी समस्या, शैक्षणिक धोरण अशा विविध विषयांवर तज्ज्ञ वक्त्यांच्या मार्गदर्शनाचे सहा सत्र संपन्न झाले. अहिल्यानगर येथील नक्षत्र लॉन्समध्ये संपन्न झालेल्या या अधिवेशनास संपूर्ण महाराष्ट्रातून महिला व पुरुषांनी मोठया प्रमाणावर आपली उपस्थिती नोंदवली होती .



समारोपाच्या महत्वाच्या सत्रात सत्यशोधक चळवळीचे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड . सुभाष निकम यांचा विशेष सत्कार करण्यात आला . महाराष्ट्रातील प्रसिद्ध विद्रोही लेखक प्रा . डॉ . राजेंद्र कुंभार ( जयसिंगपूर ) , उत्तमराव पाटील ( तरवडी ) , के . ई . हरीदास , अशोक सब्बन , भारत पाटील ( कोल्हापूर ) , संध्या मेढे यांच्या हस्ते ॲड . सुभाष निकम यांना सन्मानित करण्यात आले . यावेळी महाराष्ट्रातून मोठया संख्येने सत्यशोधक बंधू - भगिनी उपस्थित होते . ॲड सुभाष निकम यांना सत्यशोधक चळवळीतील उत्कृष्ट योगदानाबद्दल सन्मानित केल्याबद्दल गेवराई येथील पतंजली योग समितीच्या योगशिक्षक व योगसाधकांनी २ डिसेंबर रोजी त्यांचा सत्कार केला . यावेळी सर्व योगशिक्षक उपस्थित होते . या सत्काराबाबत ॲड निकम यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे .

# आई-वडिलांची सेवा करत राहणे हे आपले कर्तव्य-डॉ. आदिती सारडा

## आदित्य नर्सिंग कॉलेजमध्ये लॅम्प लाईटनिंग, कर्तव्य शपथ समारंभ उत्साहात

बीड । प्रतिनिधी

रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा आहे. त्याप्रमाणेच आई-वडिलांची सेवा सुद्धा सर्वश्रेष्ठ सेवा आहे. त्यामुळे आपण आपल्या आई-वडिलांना कधीही न विसरता त्यांची सेवा करत राहणे हे आपले कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी जीवन जगण्याचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा. शैक्षणिक जीवनामध्ये अध्ययन करताना आपल्या आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेऊन मेहनत घ्यावी यश नक्कीच मिळत राहते. असे मार्गदर्शन वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा यांनी केले.आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य नर्सिंग कॉलेजमध्ये लॅम्प लाइटनिंग व कर्तव्य शपथ समारंभ सोमवार २ डिसेंबर रोजी



मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी डॉ. आदितीजी सारडा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होत्या.

आदित्य नर्सिंग महाविद्यालयात प्रथम वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये अधि परिचारिका (नर्स) म्हणून भूमिका पार पाडत असताना आपले कर्तव्य व निष्ठा याचे भान राहावे याकरिता कर्तव्य शपथ ग्रहण समारंभाचे आयोजन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्यजी सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा , जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. सत्येंद्र डबडगावकर, वरिष्ठ आरोग्य अधिकारी डॉ. रमेश घोमरे, डॉ. हिमांशू श्रीवास्तव, प्रा. श्याम भुतडा, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा. विकास गर्जे उपस्थित होते. प्रारंभी सरस्वती प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आदितीजी सारडा पुढे म्हणाल्या की, आपल्या आई-वडिलांच्या मेहनतीचे, कष्टाचे मोल कसे करता येईल व भविष्यामध्ये त्यांना ताठ मानेने जगता येईल या दृष्टिकोनातून शैक्षणिक आणि सर्वांगीण विकास घडवून आप-आपल्या जीवनात मोठे यश संपादन करावे. आई-वडिलाचे आणि आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे योगदान सार्थक कसे होईल या दृष्टिकोनातून वाटचाल करावी. भविष्यात नर्स (अधिपरिचारिका) म्हणून रुग्णांना काळजीपूर्वक सुविधा पुराव्यात असे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी केले.

आदित्य शिक्षण संस्था तसेच आदित्य नर्सिंग महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी अत्यंत चांगले शैक्षणिक वातावरण आणि येथे रुग्णास दर्जेदार सुविधा मिळत असल्याचे पाहून मला येथे आल्याचा आनंद झाला आहे. आरोग्य क्षेत्रात नर्स (अधिपरिचारिका) यांचा मोलाचा वाटा आहे. भविष्यात शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी करण्याकरिता अनेक संधी आहेत. या संधी आपण सेवा म्हणून कराव्या असे आवाहन जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. सत्येंद्र डबडगावकर यांनी विद्यार्थ्यांना केली.

# महाराष्ट्रात महायुतीच्या सत्ता स्थापनेत मुस्लिमांचे मोठे योगदान

## पत्रकबाजीला झुगारून मुस्लिम बहुल २३ मतदार संघात महायुतीचे उमेदवार विजयी-सलिम जहाँगीर

बीड । प्रतिनिधी

मुस्लिम समाज म्हणजे आपली हक्काची व्होट बँक आहे असे समजून गेली कित्येक वर्ष राजकारण करणाऱ्या आणि मुस्लिम समाजाला विकासापासून वंचित ठेवणाऱ्या काँगेस - राष्ट्रवादी काँग्रेसला राज्यातील मुस्लिम समाजाने चांगलाच धडा शिकवला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत व्होट बँकेचे राजकारण आणि जातीय पत्रकबाजीला झुगारून तब्बल २३ मुस्लिम बहुल मतदार संघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे आता मुस्लिम मतदार देखील भाजपशी जोडला जात असून महाराष्ट्रात महायुतीची स्थापन करण्यात मुस्लिम समाजाचाही मोठा वाटा आहे असे महाराष्ट्र भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी म्हटले आहे.



महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत एकूण मतांच्या ४८% मतदान भाजपला मिळाले आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत आहे मुस्लिम समाजाचा विश्वास संपादन करण्यात भाजपला यश मिळाल्याचे निकालावरून दिसून येते. राज्यातील ३८ विधानसभा मतदारसंघात ३० टक्के पेक्षा अधिक मुस्लिम समाज आहे. या ३८ मतदार संघापैकी तब्बल २३ मतदार संघामध्ये महायुतीचे उमेदवार विजयी झालेले आहेत. ३८ पैकी केवळ १४ ठिकाणी महाविकास आघाडी तर १ जागेवर एमआयएमचा उमेदवार विजयी झालेला आहे. यावरून मुस्लिम बहुल मतदारसंघ असलेल्या २३ मतदारसंघातील मुस्लिम समाजाने भाजपच्या बाजूने आपला कौल दिला आहे. मुस्लिम समाज आता भाजपच्या बाजूने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांसोबत उभा राहत असल्याचे यावरून स्पष्ट

पान ३ वर

# केज मतदारसंघात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कामे प्रगतीपथावर

## आ. नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नाने शेतीसाठी आता दिवसाही होणार वीजपुरवठा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शेतीला केवळ रात्री वीज पुरवठा होत असल्याने हवालदिल झालेल्या केज विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांना लवकरच दिलासा मिळणार आहे. मतदार संघात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कामे प्रगतीपथावर असून त्यामुळे शेती पंपासाठी दिवसाही वीजपुरवठा करणे शक्य होणार आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिकाधिक उपकेंद्रांचा समावेश या योजनेत करण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी नियमित पाठपुरावा सुरु ठेवला होता.

सध्या शेतीला रात्री वीज पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. या पार्श्वभूमीवर, शेतीला दिवसा किमान आठ तास वीज मिळावी या हेतूने आ. नमिता मुंदडा यांनी मतदार संघातील कृषीबहुल भागातील अकरा विद्युत उपकेंद्राचा मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत समावेश करून घेतला. या योजनेतील कामे आता प्रगतीपथावर सरू आहेत. त्यापैकी मस्साजोग, विडा, बनसारोळा, माळेगाव, राजेगाव, बाघुळगाव (सर्व ता.केज) या ३३ के.ही उपकेंद्रात अतिरिक्त ५



एमव्ही चे रोहित्र बसविले जाणार असून सौरउर्जेचा वापर करून शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा करण्यात येईल. योजनेत मंजूर झालेल्या उर्वरित ३३ के.व्ही. उपक्रकेंद्रातील पॉवर ट्रॉन्सफोर्मर बसविण्याचे काम दोन महिन्यात पूर्ण होईल. त्यानंतर सौर पॅनलचे

पान ३ वर

## आ.सुरेश धस यांना कॅबिनेट दर्जाचे मंत्रीपद देऊन सन्मान करावा -डोंगरे

खालापुरी । प्रतिनिधी

विधानसभेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातून ७७ हजाराची लीड घेऊन मोठ्या मताधिक्याने विजय झालेले भाजपाचे आमदार सुरेश आण्णा धस यांना तीस वर्षाचा कामाचा दांडगा अनुभव पाहता होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये कॅबिनेट दर्जाचे मंत्रीपद देऊन त्यांचा सन्मान करावा अशी मागणी त्यांचे कट्टर समर्थक टेंभुर्णी चे सरपंच मिथुन डोंगरे व श्रिराम केदार यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे.



पत्रकातील पुढे बोलताना ते म्हणाले की सुरेश आण्णा धस म्हणजे जिवाभावाचा माणूस कामाचा माणूस म्हणून गेली ल ३० ते ३५ वर्षापासून त्यांच्याकडे पाहिले जाते त्यांना कोणाचाही फोन आला तर त्यांचे ते काम झालेत समजा रात्रंदिवस जनसेवेचा वसा घेतलेली अण्णा म्हणजे ओपन टू ऑल नेतृत्व गोरगरिबांची सेवा हीच ईश्वर सेवा समजून अनेक दशकांपासून ते कार्य करत आहेत त्यामुळेच या निवडणुकीत त्यांना आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून मतदारांनी भरभरून प्रेम दिले विकासाचे ध्यास असलेल्या या नेतृत्वाला होणाऱ्या या मंत्रिमंडळ विस्तारात मंत्रीपद देणे ही गरजेची असून ते भाजपच्या वरिष्ठांनी द्यावी असेही त्यांनी असे मिथुन डोंगरे व श्रिराम केदार यांनी पत्रकात म्हटले आहे.

# कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापी सहन करणार नाहीत; अनिल जगताप यांचा इशारा

बीड । प्रतिनिधी

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे असून याच कलाकारांना स्वतःच्या कलेचं सादरीकरण करण्याकरिता बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह एकमेव पर्याय आहे. मात्र कलाकारांच्या या नाट्यगृहाकडे बीड नगर परिषद वारंवार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसून येते आहे. राज्य नाट्य स्पर्धा ऐन तोंडावर आलेली असताना सध्य परिस्थितीत कलाकारांचं नाट्यमंदिर अंधारात धूळ खात पडलेलं आहे. काल रोजी नाट्यगृहाचे १ लाख २० हजार रुपये थकीत वीजबील दिले नसल्याने महावितरण अधिकाऱ्यांनी नाट्यगृहाचा वीज पुरवठा बंद केला आहे. बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांनी तात्काळ कलाकारांच्या नाट्यगृहाची वीज थकबाकी भरून नाट्यगृहातील अंधार दूर करावा. कलाकार शहराचे संस्कृतीक वैभव टिकवण्याचे काम करतात. या कलाकारांना कोणी वाली नाही असा गैरसमज मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांनी करून घेऊ नये.

### कर्मचाऱ्यांच्या थकीत पगाराची सोय करावी

गेल्या आठ ते नऊ महिन्यांपासून नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांचा पगार देखील नगर परिषदेने दिला नाही. गोरगरीब कर्मचारी रात्रंदिवस नाट्यगृहाची निगा राखतात, नाट्यगृहाची काळजी घेतात असे असताना जर त्यांचा महिन्यानुमहीने पगार होत नसेल तर ही बाब निष्काळजीपणाची आहे त्यामुळे मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची देखील लवकरात लवकर सोय करावी असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांना केले आहे..



कलाकारांच्या पाठीशी कायम शिवसेना मोठ्या ताकदीने उभी आहे त्यामुळे कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत. असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांना दिला आहे.

## सर्वसामान्यांच्या हितासाठी आ.धस यांना भाजपाने मंत्री करावे-आभंग

खालापुरी । प्रतिनिधी

आमदार सुरेश आण्णा म्हणजे जनसामान्यांचा नेता गोरगरिबांचा कैवारी असून झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजपची शान राखलेले नेतृत्व होय या नेतृत्वाला मतदारसंघासह जिल्ह्यात जनसामान्यांच्या हितासाठी मंत्रिपदीने गरजेचे असुन ते द्यावे अशी मागणी पाटोदा -शिरूर कासार कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग आभंग यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.



आमदार सुरेश आण्णा धस यांचे कार्य हे अफलातून असून गोरगरिबांच्या कल्याणासाठी झटणार आहे त्यामुळेच जिल्ह्यात त्यांचा नावलौकिक आहे कार्यसम्राट म्हणून ओळख असलेले अण्णा रात्रंदिवस सेवा करताना दिसतात उण पाऊस वारा याची तमा न बाळगता त्यांचे कार्य हे अविरतपणे सुरू असते त्यामुळेच या विधानसभेच्या निवडणुकीत मतदारसंघातील जनतेने भरगोस मताधिक्य देऊन त्यांना विजयी केले आहे त्यामुळे पक्ष श्रेष्ठींनी याची दखल घेऊन त्यांना होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये समाविष्ट करून मंत्रीपद द्यावेत असेही संचालक पांडुरंग अभंग यांनी म्हटले आहे.

# मतिमंद निवासी विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन साजरा

गेवराई । प्रतिनिधी

रेणुकामाता बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाडुंळा संचलित मतिमंद निवासी विद्यालय गेवराई येथे मंगळवार दि.३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एम.आर रणबावळे, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव शिवाजी ढोबळे, पत्रकार विनोद पौळ यांच्या सह आदि मान्यवर उपस्थित होते.



३ डिसेंबर हा दिवस सर्वत्र जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा केला जातो. दरम्यान गेवराई येथील मतिमंद निवासी विद्यालयात जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात करुन परिसरात जनजागृती रॅली काढण्यात आली. तर दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच फराळाचे वाटपही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष शिक्षक रविंद्र अरबाड, फिजिओ थेरापिस्ट प्रल्हाद बोंदरे, वस्तीगृह अधिक्षक संदिप खाडे, प्रशांत सरोदे, विष्णू बर्वे, विश्वास शेळके, संतोष पुंड, भागिरथी उगले, अंकुश लाटे यांच्यासह अदि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## धारूर येथे रक्तदान शिबिर संपन्न २१ रक्तदात्यानी केले रक्तदान



किल्ले धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारुर युथ क्लबच्या वतीने दिलासा संस्थेचे संस्थापक कै.मधुकर भाऊ धस यांच्या आठव्या पुण्यतिथी निमित्त रक्तदान शिबिर आयोजित केले होते या शिबिरात एकूण एकवीस रक्त दात्यानी रक्तदान केले.

दिलासा संस्थेचे संस्थापक स्व.मधुकर भाऊ धस यांनी २०१६ साली दुष्काळ मुक्त करण्यासाठी शहरातील चार तलाव खोलीकरण व वाण नदीवर डोह करत शहर व परिसर पाणीदार करण्यात मोलाचे सहकार्य लाभल्याने किल्ले धारुर शहर व परिसर पाणीदार झाला. दिलासा संस्थेचे कार्य युद्धपातळीवर असताना अल्पशा आजाराने त्यांच ३ डिसेंबर २०१६ रोजी निधन झाले. कै.मधुकर भाऊ धस पुण्यतिथी निमित्त दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन किल्ले धारुर युथ

पान ३ वर

# दिव्यांगांच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणार -आदित्य जीवने

**बीड । प्रतिनिधी**

**दिव्यांगासाठी विविध शासकीय योजना आहेत. त्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणार असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी आज केले.**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सामाजिक न्याय भवन येथे मुख्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जीवने बोलत होते. दिव्यांगामध्ये अद्वितीय शक्ती असून त्यामुळे ते जिद्दीने व चिकाटीने यश संपादन करतात, असे प्रमुख वक्ते डॉ. अनिल बारकुल म्हणाले. प्रास्ताविक जिल्हा समाज



कल्याण अधिकारी श्रीमती एस. एन. मेश्राम यांनी केले. सूत्रसंचालन सुनील भोंडवे यांनी केले. आभार अंकुश नखाते यांनी मानले. कार्यक्रमास दिव्यांग कर्मचारी संघटनेचे राजेंद्र लाड, रहीम शेख, खेळाडू ज्योतीराम घुले, आदिनाथ हाडोळे, तत्वशील कांबळे, अशोक तांगडे, शहरातील सर्व दिव्यांग शाळांचे मुख्याध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आदींची बहुसंख्येने उपस्थिती होती.

# समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मतभेद विसरून एकजूट होण्याची गरज

माजलगाव । प्रतिनिधी

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वीरशैव लिंगायत समाज बांधवांनी आपसाआपसांतील सर्व मतभेद विसरून एकजूट करण्याची गरज आहे, समाजासमोर नवा आदर्श प्रस्थापित करावा, असे आवाहन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. दरम्यान, दि ०२ डिसेंबर सोमवार रोजी श्री संस्थान मठ माजलगाव येथे लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंतीनिमित्त सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला समाज बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला.



श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची समाजबांधवांना साद

लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंती निमित्ताने श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या नेतृत्वाखाली वीरशैव समाजातील सर्व लिंगायत

पान ३ वर

# राज्यमंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या आ.प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदारसंघाचा विकास आ.प्रकाश सोळंके यांनीच केला आहे.आणि विकासाचा जो बॅगलॉग राहिला आहे.तो पूर्ण करण्याची धमक ही आ.प्रकाशदादा सोळंके यांचीच आहे.त्यामुळे विकास पुरुष असणाऱ्या व राज्य मंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या प्रकाशदादांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागनी बाजार समितीचे सभापती जयदत्तआण्णा नरवडे व उपसभापती श्रीहरीनाना मोरे यांनी पक्षश्रेटीकडे केली आहे.



**सभापती नरवडे उपसभापती मोरे यांची पक्षश्रेष्ठीकडे मागणी**



माजलगाव मतदार संघात विकासाची मुहूर्तमेढ माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांनी रोवली आहे.तोच आदर्श आ. प्रकाश सोळुंके यांनी मतदारसंघात सुरू करून विकासाची गंगा या ठिकाणी ओढून आणली आहे. राज्यमंत्रीपदाच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी मतदार संघाचा कायापालट केला आहे.मंत्री पदाचा त्यांना अनुभव आहे.मतदारसंघात जो विकास झाला आहे,तो आ. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली झाला आहे.त्यामुळे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदार संघातील मतदारांनी

पान ३ वर

# मराठी पत्रकार परिषदेच्या आरोग्य शिबिराला मोठा प्रतिसाद

## राज्यातून १० हजारांच्या वर रक्तदात्यांनी केले रक्तदान - मुख्य विश्वस्त एस एम देशमुख

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदशनाखाली पूर्ण राज्यात काल ३ डिसेंबर रोजी मराठी पत्रकार परिषद च्या ८६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या राज्यात जागोजागी रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी एकूणच जवळपास राज्यातून १० हजारांच्या वर पत्रकारांनी आपल्या परिवारासह या शिबिरात सहभाग नोंदवलेला दिसून आला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.



बीड जिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने काल बीड जिल्हा रुग्णालयात पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या शिबिराला मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.



यात बीड जिल्हात चांगलाच प्रतिसाद मिळाला आहे. जिल्ह्यातून सर्व अकरा तालुक्यातून मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. यात बीड, गेवराई,

पान ३ वर

### एस.एम.देशमुख यांनी मानले आभार

मराठी पत्रकार परिषदेच्या ८६ व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्रभर पत्रकारांची आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिरे झाली, या शिबिराला महाराष्ट्रातील पत्रकारांनी उदंड प्रतिसाद दिला. या प्रतिसादाबद्दल मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी सर्व पत्रकारांचे आभार मानले आहेत.

## जाहिरात फलक लावल्यास फौजदारी कारवाई होणार

जालना । प्रतिनिधी

महानगरपालिका व नगरपालिका नगरपंचायत या अंतर्गत जाहिरात फलक लावू नये लावल्यास कारवाई होणार.अनाधिकृत जाहीराती घोषणा फलक, होडींग व पोस्टर्स बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. १५५/२०११ मे. सुस्वराज्य फाऊंडेशन सातारा आणि इतर विरूध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर या याचिकेवरील सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३१/०१/२०१७ रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे. तसेच या प्रकरणात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी वेळोवळी दिनांक ०९/१०/२०२४ व दिनांक १८/११/२०२४ रोजी अनाधिकृत फलक, होडींग व पोस्टर्स विरोधात कार्यवाही करणे बाचत आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी जालना शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीक / व्यवसायिक एजन्सीधारक

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मला मंत्री करण्याची अजितदादांची ही इच्छा' सुनील शेळकेंच्या वक्तव्याने उत्सुकता वाढली

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

राज्यात गुरूवारी मुख्यमंत्री आणि काही मंत्र्याचा शपथविधी पार पडणार आहे. अद्याप शपथ घेणाऱ्या नेत्यांची नावे गुलदस्त्यात आहेत. तर पुण्यातील मावळ विधानसभा मतदारसंघातून मावळ पॅटर्न मोडीत काढून विक्रमी मतांनी विजयी होणारे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार सुनील शेळके यांना देखील मंत्रीपद मिळण्याच्या चर्चा आता सुरू आहेत. अशातच मला मंत्री करण्याची इच्छा अजित दादांची ही आहे, असं म्हणत मावळचे आमदार सुनील शेळकेंनी आणखी उत्सुकता वाढवली आहे. अजित पवार गटाच्या संभाव्य मंत्री पदाच्या यादीत मावळच्या सुनील शेळकेंचं नाव आहे. भाजप, शरद पवार गट, ठाकरेंची शिवसेना, कॉंग्रेस, मनसे यांसह विविध संघटनांच्या मावळ पॅटर्नवर शेळके भारी पडलेत. शेळके एक लाख आठ हजारांच्या मताधिक्याने निवडून आल्यानं अजितदादा त्यांना मंत्री पदाचं बक्षीस देतील, असा त्यांना विश्वास आहे.



याबाबत बोलताना सुनील शेळके म्हणाले, 'माध्यमांमध्ये मला मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे अशा बातम्या पाहिल्या. परंतु मी अजित पवार, प्रफुल पटेल, छगन भुजबळ या कोणत्याही पक्षातील मोठ्या नेत्यांकडे माझी व्यक्तिगत इच्छा व्यक्त केलेली नाही. महायुतीमध्ये भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस हे तीन पक्ष आहेत. या पक्षातील प्रमुख नेत्यांना पहिले मंत्रिमंडळामध्ये स्थान दिले जाईल. त्यानंतर नवीन चेहऱ्यांना देखील संधी मिळणार आहे अशा पद्धतीची काही माहिती मला मिळाली आहे. मात्र, उद्याच्या काळामध्ये एखादी मोठी जबाबदारी मिळाली तर माझ्या पक्ष संघटनेकरता तालुक्याच्या विकासाकरिता अधिकच योगदान किंवा अधिक काम करण्याची ही माझी जबाबदारी असणार आहे, असं सुनील शेळके यांनी म्हटले आहे. मी पक्षातील कोणतेही मोठ्या नेत्याकडे मंत्रिपदाची किंवा कोणत्याही पदाची मागणी केलेली नाही मी तितका मोठा नाही. सुनील शेळकेने ज्या संघर्षातून ज्या परिस्थितीतून ही निवडणूक जिंकलेली आहे ते पक्षातील नेते जाणतात. लाखांचं मताधिक्य ज्या वेळेला मिळतं देखील विचार करत असतात आणि त्याच पद्धतीचा नेते मंडळी माझा देखील विचार करत आहेत. परंतु येत्या काळामध्ये आम्हाला आमचा पक्षाला किती जागा मिळत आहेत, त्यावरून अनेक गोष्टी ठरतील सुनील शेळके यांनी म्हटलं आहे.

# अमली पदार्थ विक्री प्रकरणी तीन उच्चशिक्षित तरुणांना अटक

पुणे – सिंहगड रस्ता परिसरात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तीन उच्चशिक्षित तरुणांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून ओजीकुश गांजा, मेफेड्रोन आणि एलएसडी असा १९ लाख ४५ हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत.



अंशुल संतोष मिश्रा (वय–२७, रा. बुलडाणा), आर्श उदय व्यास (वय २५, रा. पंतनगर, घाटकोपर पूर्व, मुंबई), पियुष शरद इंगळे (वय–२२, रा. चिखली, चिंचवड) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. अंशुल बी.ए. पदवीधर असून, आर्श एका विमान कंपनीत नोकरीस होता. पियूषने संगणक अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. हे तिघेजण त्यांच्या ग्रुपमधील काही तरुणांना अमली पदार्थ विक्री करीत होते. अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलिस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, पोलिस निरीक्षक उल्हास कदम पथकातील कर्मचाऱ्यांसह सिंहगड रस्ता परिसरात गस्तीवर होते. त्यावेळी नऱ्हे भागातील भूमकर चौकात तिघेजण अमली पदार्थाच्या विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिस अंमलदार संदीप शिर्के यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून तिघा तरुणांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता २५१ ग्रॅम ओजीकुश गांजा, १५ ग्रॅम मेफेड्रोन आणि ६२ मिलिग्रॅम एल.एस.डी. अमली पदार्थ आढळून आले. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पोलिस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त शैलेश बलकवडे, पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे, सहाय्यक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली विरोधी पथकाचे सहाय्यक निरीक्षक अनिकेत पोटे, उपनिरीक्षक दिगंबर कोकाटे, पोलिस अंमलदार सचिन माळवे, विनायक साळवे, प्रवीण उतेकर, संदेश काकडे, दत्ताराम जाधव, सुजित वाडेकर, नूतन वारे, रेहाना शेख, विपुल गायकवाड यांनी ही कारवाई केली.

# ईव्हीएम विरोधात पिंपरीत आंदोलन; संभाजी ब्रिगेडच्या आंदोलनात सामाजिक कार्यकर्त्यांचा सूर

पिंपरी – हक्काच्या बालेकिल्ल्यातही अनेक उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला. या निकालावर सर्वसामान्यांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर आहे. ही नाराजी सध्या सोशल मिडियातून व्यक्त होत आहे. जनतेतून मोठा उठाव होऊन ईव्हीएम हटविले जाईल, असा सूर संभाजी ब्रिगेडच्या आंदोलनात विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.




पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संभाजी ब्रिगेडच्या वतीने रविवारी (दि. १) इव्हीएम विरोधात धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी इव्हीएम हटवून मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. यावेळी उपस्थित विविध संस्था संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, माजी नगरसेवक मारुती भापकर, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रकाश जाधव, धम्मराज साळवे, शांताराम खुडे, रोहिनाज शेख, प्रदीप पवार, संजीवनी पुराणिक, सीपीएमचे सचिन देसाई, संतोष शिंदे, शरद थोरात आदींनी मनोगत व्यक्त केले. लोकशाहीमध्ये जनता सर्वश्रेष्ठ आहे. नागरिक योग्य सुशासन चालविण्यासाठी आणि सक्षम लोकशाही मुल्ये रुजविण्यासाठी मोठ्या संख्येने रस्त्यावर येतात. त्याच पद्धतीचा उठाव ईव्हीएमविरोधात होईल, असे सध्याचे चित्र आहे. पिंपरी–चिंचवड शहरातील नागरिकांमध्ये हा रोष असून ईव्हीएम हटवून मतपत्रिकेवर आगामी निवडणूका घ्याव्यात. तसेच सध्या झालेल्या निकालावर योग्य चौकशी करावी, अशी मागणीही या आंदोलनात करण्यात आली. या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गणेश दहिभाते, जिल्हा कार्याध्यक्ष लहुजी लांडगे, शहराध्यक्ष सतीश काळे, शहर कार्याध्यक्ष विशाल मिठे, उपाध्यक्ष मुकेश बोबडे, सचिव बाळासाहेब मुळे, मराठा सेवा संघाचे वसंत पाटील, अनिल गाडे, गणेश देवराम, प्रकाश घोडके, सालार शेख, लहू अनारसे, प्रशांत चव्हाण, दिलीप कैतके, छावा संघटनेच्या शीतल मोरे, नरेंद्र पोटे, संजय गायकवाड, श्रीपती पाटील, जयंत गायकवाड, संजय भांगिदरे, विनोद ताटे, गजानन पाटील आदींनी सहभाग घेतला. आंदोलनाचे आयोजन सतिश काळे यांनी केले.

# कर्ज मिळवून देण्याच्या आमिषाने व्यावसायिकाची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

व्यवसायासाठी चार कोटी रुपयांचे कर्ज मिळवून देण्याच्या आमिषाने एकाची सात लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी समर्थ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.




तन्मय जाधव असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत किशोर चौधरी यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादींची एका परिचितामार्फत आरोपी तन्मय जाधवशी ओळख झाली होती. फिर्यादीला व्यवसायासाठी चार कोटी रुपयांचे कर्ज हवे होते. जाधवने व्यंकटेश्वरा एंटरप्रायजेस या खासगी वित्तीय संस्थेकडून १५ दिवसांत चार कोटी रुपयांचे कर्ज मिळवून देतो, असे आमिष त्यांना दाखविले. त्यानंतर फिर्यादींना त्याने रास्ता पेठेतील एका हॉटेलमध्ये बोलावून घेतले. तेथे त्यांच्याबरोबर मुद्रांकावर करारनामा केला. कर्ज मंजुरीसाठी त्यांच्याकडून वेळोवेळी सहा लाख ८७ हजार रुपये जाधवने घेतले. मात्र, त्यांना कर्ज दिले नाही. याबाबत व्यावसायिकाने त्याच्याकडे विचारणा केली. तेव्हा त्याने टाळाटाळ केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक जे. आर. फडतरे हे पुढील तपास करत आहेत.

# सोनिया गांधी या दूरदृष्टीच्या नेत्या ; पृथ्वीराज चव्हाण यांचे प्रतिपादन

पुणे – माजी मुख्य मंत्री पृथ्वीराज चव्हाण 'सेवा, कर्तव्य आणि त्याग सप्ताहा'च्या उदघाटनला उपस्थित होते. यावेळी त्यांनी माहितीचा अधिकार, अन्न सुरक्षा कायदा, हे कायदे आणि मनरेगा योजना आणणाऱ्या आदरणीय सोनिया गांधी या दूरदृष्टीच्या नेत्या आहेत, असे प्रतिपादन केले. अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाच्या माजी अध्यक्षा आदरणीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा, कर्तव्य, त्याग सप्ताहा'चे उदघाटन पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.





सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपदाचा त्याग केला, त्या क्षणाचा मी साक्षीदार आहे. १९९१साली सोनियाजींनी केवळ इच्छा व्यक्त केली असती तरी, त्या पंतप्रधान झाल्या असत्या. २००४सालच्या निवडणुकीतील विजय हा सोनिया गांधींचा होता. त्यांच्या जाहीरनाम्यावर लोकांनी मते दिली. तरीही त्यांनी पंतप्रधानपद स्वीकारले नाही, विधानसभा निवडणुकीचा निकाल आश्चर्यकारक आहे. लोकशाही पद्धतीने निवडणूक घेतली हे सिद्ध करून लोकांच्या मनातील संशय दूर करण्याची जबाबदारी निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारची आहे, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले. सोनिया गांधींच्या त्यागाची आठवण जपणारा असा उपक्रम देशात कुठेही होत नाही. मात्र, गेली २० वर्षे मोहन जोशी यांनी हा उपक्रम सातत्याने चालू ठेवला आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. सोनिया गांधी यांनी भारतीय संस्कृती जपली. त्यांनी भारताची सेवा केली. महात्मा गांधी, पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांची प्रतिमा मलीन करण्याची मोहीम सध्या सुरू आहे, त्या विरोधात रस्त्यावर उतरले पाहिजे, असे मत उल्हास पवार यांनी व्यक्त केले. या सप्ताहाची माहिती मोहन जोशी यांनी या कार्यक्रमात बोलताना दिली. विधानसभा निवडणुकीतील एकतर्फी निकालामुळे अस्वस्थता असली तरी, कॉंग्रेसचा कार्यकर्ता 'जिवंत' आहे. आगामी निवडणुकांना सामोरे जाण्यासाठी तो तयार आहे, अशी ग्वाही मोहन जोशी यांनी दिली. या कार्यक्रमाला माजी मंत्री रमेश बागवे, माजी आमदार रवींद्र धंगेकर, डॉ.कैलास कदम, प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस संजय बालगुडे तसेच दत्ता बहिरट, लता राजगुरू, अविनाश बागवे, सदानंद शेट्टी, चंद्रशेखर कपोते, भीमराव पाटोळे, अनील सोंडकर, प्रशांत सुरसे, सौरभ अमराळे, सप्ताहाचे आयोजक, माजी आमदार, प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी व्यासपीठावर उपस्थित होते. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या पदमजी हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश आबनावे यांनी केले. तर दत्ता बहिरट यांनी सर्वांचे आभार मानले.

# चंपाषष्ठी उत्सवाला जेजुरी गडावर प्रारंभ

**जेजुरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणार्या जेजुरीच्या श्री खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवाला जेजुरी गडावर प्रारंभ झाला असून, करवीर पीठाचे शंकराचार्य श्री नृसिंह भारती यांच्या हस्ते श्री खंडोबा व म्हाळसादेवीच्या उत्सव मूर्तींची घटस्थापना करण्यात आली.



सोमवारी (दि. २) श्री खंडोबा मंदिरात देवाची पूजा अभिषेक झाल्यानंतर उत्सवमूर्तींची वाजतगाजत मिरवणूक काढून मूर्ती रंगमहालात आणण्यात आली. करवीर पीठाचे शंकराचार्य श्री नृसिंह भारती, देवसंस्थानचे विश्वस्त, पुजारी, सेवकवर्ग व ग्रामस्थांच्या वतीने पूजा करून घटस्थापना करण्यात आली. या उत्सवानिमित्त गडावर धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. घटस्थापनेनिमित्त हजारो भाविकांनी श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजित देवकाते, विश्वस्त अॅड. पांडुरंग थोरवे, मंगेश घोणे, पोपटराव खोमणे, डॉ. राजेंद्र खेडेकर, विश्वास पानसे, माजी विश्वस्त डॉ. प्रसाद खंडागळे, सुधीर गोडसे, नितीन राऊत, जय मल्हार चंपाषष्ठी अन्नछत्र प्रतिष्ठानचे गणेश आगलावे, प्रशांत सातभाई, बाळकृष्ण दीडभाई, हनुमंत लांघी, तसेच गुरव, घडशी, कोळी, वीर सामाजाचे पुजारी, सेवकवर्ग उपस्थित होते. या उत्सवाचे पौरोहित्य वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी यांनी केले.

### चंपाषष्ठीबाबत असलेले महात्म्य

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाच्या वर्षाकाठी आठ यात्रा भरतात. दरवर्षी ५० लाखांहून अधिक भाविक येथे देवदर्शनासाठी येतात. खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवाला धार्मिक महत्त्व आहे. पौराणिक काळात मनी आणि मल्ल दैत्यांचा संहार करण्यासाठी श्रीमहादेवाने खंडोबाचा अवतार घेऊन दैत्यांशी युद्ध केले. सहा दिवस युद्ध करून दैत्यांचा पराभव करून विजय मिळविला. या विजयाचे प्रतीक म्हणून पौराणिक काळापासून जेजुरी गडावर चंपाषष्ठी उत्सव साजरा केला जातो.

# राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या भरारी पथकाच्या कारवाईत ९ लाखाहून अधिक रुपयाचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे विभागाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथकाच्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईत आंबेगाव तालुक्यात मंचर गावचे हद्दीत चाकण रोडवरील पेट्रोल पंपासमोर चविष्ठ ढाब्याजवळ, भोरवाडी येथे वाहनाची तपासणी केली असता वाहनातून परराज्यनिर्मीत असलेला भांग मिश्रीत पदार्थाच्या वाहनासह एकूण ९ लाख ५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांनी दिली आहे.



याप्रकरणी प्रविण मगाराम चौधरी, देहुफाटा, चाकण ता. खेड यांच्याविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा अधिनियम १९४९ अन्वये १ डिसेंबर रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्हयामध्ये महालक्ष्मी आयुर्वेदिक फार्मानिर्मीत स्पेशल बावा विजयावटी भांग मिश्रीत पदार्थाने तयार केलेल्या गोळयांच्या पाकीटांनी भरलेल्या सुमारे ५० किलो ग्रॅमच्या एकूण ५ गोण्या अंदाजे २५० किलो ग्रॅम वजानाचे भांग मिश्रीत पदार्थ, एक पांढऱ्या रंगाचे मारुती सुझुकी कंपनीचे सीएनजी सुपर कॅरी मॉडेलचे चार चाकी वाहन क्रमांक व एक व्हिओ कंपनीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाईत निरीक्षक नरेंद्र थोरात, दुय्यम निरीक्षक विराज माने व धिरज सस्ते, प्रताप कदम, सतिश पौंधे, शशिकांत भाट,रणजीत चव्हाण, अनिल थोरात, अमोल दळवी, राहुल तारळकर सहभाग घेतला. अवैद्य दारू व्यवसाय करणाऱ्यावर अशाच प्रकारची कारवाई सूरू राहणार असून कोठेही अवैद्य दारू व्यवसाय सूरू असल्यास राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०२०–२९९११९८६ वर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे.

# शासकीय कर्मचारी हेच ठेकेदार ही पद्धत बंद

**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून शासकीय अधिकारी, कर्मचार्यांनी समन्वयातून येथून पुढे शासकीय कामकाज करणे गरजेचे आहे. कोणत्याही शासकीय कार्यालयात नागरिकांना आपल्या कामांकरिता विनाकारण हेलपाटे मारावे लागणार नाही याची काळजी घेऊन झिरो पेंडन्सी कामकाज सर्व शासकीय कार्यालयात होणे अपेक्षित आहे. यापुढे शासकीय अधिकारी व कर्मचार्यांनी शासकीय कामाचे ठेके घेऊ नयेत. शासकीय कर्मचारी हे ठेकेदार अशी चुकीची पद्धत जुन्नर तालुक्यामध्ये बंद करणार असल्याचा इशारा शिवजन्मभूमी जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी दिला.



जुन्नर शासकीय विश्रामगृहात सोमवारी (दि. २) आयोजित शासकीय अधिकारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी तहसीलदार सुनील शेळके, पोलीस उपविभागीय अधिकारी रवींद्र चौधर, प्रशांत कडूसकर, विठ्ठल भोईर,गणेश भोसले, किरण अवचर, प्रदीप चव्हाण,अनिता शिंदे, निलेश बुधवंत, मंगल गवळी, गोरक्षनाथ आगळे, संदीप भोळे आदींसह तालुक्यातील विविध विभागांचे शासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. या बैठकीत उपस्थित शासकीय अधिकार्यांनी आपापल्या विभागांचा कामकाजाचा तसेच विकासकामांचा आढावा यावेळी सादर केला. आमदार शरद सोनवणे यांनी पिंपळगाव जोगा धरणातून शेतकर्यांकरिता तातडीने पाणी सोडण्याबाबत वरिष्ठ अधिकार्यांशी चर्चा करून येत्या काही दिवसात हे नियोजन करण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाला दिल्या तसेच येडगाव येथील क्रीडा संकुल इमारत, जुन्नरमधील प्रशासकीय इमारत बांधकाम, माणिकडोह आयटीआय दुरवस्था, तालुक्यातील कालव्यांची दुरुस्ती, शासकीय कार्यालमध्ये सोलर यंत्रणा, बिबट सफारी, जुन्नरमधील भुयारी गटार योजना, माणिकडोह धरणातून पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठा आदी विकासकामाबाबत त्यात्या विभागांच्या शासकीय अधिकार्यांनी गांभीर्याने कामकाज करण्याच्या सूचना दिल्या. या बैठकीमध्ये सचिन वाळुंज, अविनाश कर्डिले, गणेश नायकोडी, विकास राऊत उपस्थित होते. याप्रसंगी तालुक्यातील विविध गावांचे सरपंच विविध संघटनेचे पदाधिकारी तसेच संस्थेचे पदाधिकारी यांनी नवनिर्वाचित आमदार शरद सोनवणे यांचा सन्मान यावेळी केला.

# पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशन आयोजित वकील दिन पिंपरी कोर्टात उत्साहात साजरा

पुणे । प्रतिनिधी

नेहरू नगर पिंपरी न्यायालयात पुरुष बार रूममध्ये पिंपरी चिंचवड एडवोकेट असोसिएशन यांनी वकील दिन उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात ही प्रमुख व्याख्याते ड.विजय भोसले प्रमुख उपस्थिती मा अध्यक्ष ॲड नाना रसाळ व कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.काका काळभोर व तसेच प्रमूख उपस्थिती लाभलेले ऍड. नाना रसाळ यांनी वकीलवर्गाला शुभेच्छा देऊन वकिलांचे स्वातंत्रपूर्व काळापासून सामाजिक कार्याबद्दल माहिती दिली. वकील दिनाचे औचित्य साधून म्हणून माजी महिला अध्यक्ष ड. प्रमिला हरीश गाडे यांनी वकील वर्गावर होणाऱ्या हल्ल्याबाबत सांगून वकील वर्गाच्या भवितव्यासाठी संरक्षण कायदा झाला पाहिजे असे ठाम सांगितले तसेच त्या विषयावर मार्मिकपणे विश्लेषण साधून सविस्तर असे वकीलवर्ग कसे सर्वोच्च आहे स्वातंत्रपूर्व लढ्यात वकीलवर्गानी अहोरात्र प्रयत्न करून भारताचे संरक्षण केले. तसेच ऍड. बी के कांबळे सर यांनी सर्व थोडं वकील वर्गाला बुद्धीवादी वर्ग उल्लेख करून अनमोल असे मार्गदर्शन केले. यावर चिंचवड पिंपरी ऍड असोसिएशन तर्फे महिला सचिव ऍड. कुशलकर यांनी हमी दिली कि वकीलवर्गाला येणाऱ्या अडचणीस असोसिएशन योग्य ती कायदेशीर मदत करतील.



कार्यक्रमास मा.अध्यक्ष अॅड.सुनील कडुसकर त्याचबरोबर मोठ्या संख्येने वकील वर्ग हजर होता.मा.अध्यक्ष ड.नाना रसाळ व मा. अध्यक्ष अॅड.प्रमिला गाडे व मा.उपाध्यक्ष प्रतीक जगताप मा.उपाध्यक्ष गोरख कुंभार सीनियर विविध तज्ञ ड.बी.के कांबळे व ड.नारायण थोरात व ड.संभाजी वाघमारे व ड.राजरतन जाधव अॅड.प्रवीण जगताप अॅड.सर. एम माने अॅड.घोलप, ऍड. डांगे मा.अध्यक्ष साने सर ऍड. पूनम शर्मा,अॅड.तेजस चौरे ड.पल्लवी कुऱ्हाडे ड चांगुणा काकडे अॅड.सूर्या सर अॅड.घोरपडे सर अॅड.कडू अॅड.नितीन कांबळे अॅड.लबडे अॅड.मिलिंद कांबळे अॅड.सुनील माने अॅड.हास्यसम्राट प्रताप साबळे अॅड.मुकुंद ओव्हाळ नोटरी अधिक चरेगावकर.ऍड. अक्षय भालेराव,अॅड.अभिनंदन सूर्यवंशी ऍड तुषार खरात ऍड विशाल गभाले अॅड.पवण गायकवाड ऍड महेश गायकवाड ऍड सुनिल क्षीरसागर, ऍड. प्रशांत बचूटे ,अॅड.मुस्ताफिज शेख अॅड.जयेश वाकचौरे अॅड.अजय शर्मा अॅड.विठ्ठल पिंटू अॅड.राजेश रणपिसे अॅड.कुलदीप बकाल महिंद्रा दांडगे महेश जानकर तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष पांडुरंग शिनगारे उपाध्यक्ष अजय यादव सचिव संदीप तापकीर महिला सचिव संगीता कुशलकर सहसचिव पद्मावती पाटील खजिनदार विशाल पोळ हिशोब तपासणी प्रेरणा चंदानी सदस्य विजय धोंडीराम धोंडे अक्षय चौधरी आरती कुलकर्णी पोर्णिमा मोहिते रुपाली पवार सुषमा पाटील व ईतर असंख्य वकील वर्ग हजर होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऍड संगीता कुशलकर यांनी केले तसेच आभार प्रदर्शन ऍड. आरती कुलकर्णी यांनी केले.